महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

# हाकारा

वर्ष : २५ वे
अंक : पहिला

जानेवारी - मार्च २००४




## पुस्तक परिचय विशेषांक

## हाकारा अंक सूची

१९८० - १. जबरन जोत जंगल जमीन २. आदिवासी व शिक्षण
३. आदिवासी वनसंवर्धन ४. आदिवासी साहित्य व कला

१९८१ - १. दलितांना सवलती व राखीव जागा
२. आदिवासी व आरोग्य ३. वनशेती व संवर्धन
४. रोजगार हमी योजना

१९८२ - १. धरणे व विकास २. धरणे व विकास
३-४. जंगल व्यवस्थापन

१९८३ - १. आदिवासी व दारु
२.आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
३. प्रा. सरदार गौरव अंक
४. आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न

१९८४ - १-२ आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
३. आदिवासी स्त्री ४. आदिवासी आरोग्य व शिक्षण

१९८५ - १. आदिवासी संघटन २. जमीन हस्तांतर
३. आदिवासी महिला ४. आदिवासी व सरकार

१९८६ - १. जंगल व धरण २. आदिवासी कला
३. आदिवासी व वेठबिगारी
४. आदिवासीविषयक ग्रंथ : मानवशास्त्र परिचय

१९८७ - १. भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
२. आदिवासी आणी सांस्कृतिक बदल
३-४. राष्ट्रीय वननितीचा प्रश्न

१९८८ - १. सवलती अपहरणाची समस्या
२. आदिवासी साहित्य
३-४. आदिवासी समाज व संस्कृती

१९८९ - १-२. डॉ. वेरिअर एल्विन विशेषांक
३-४. व्यवसाय मार्गदर्शन

१९९० - १-२. महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
३. जागतिक आदिवासी
४. गं. बा. सरदार स्मृति विशेषांक

१९९१ - १. आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
२. आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
३. आदिवासी जिवन व संस्कृती

१९९२ - १-२. आदिवासी समाज जीवन
३-४. अनुताई वाघ विशेषांक

१९९३ - १-२. आदिवासी धर्म, सण व उत्सव
३-४. धरण - विस्थापन व पुनर्वसन

१९९४ - १. आदिवासी संस्कृती
२. आदिवासी एकता परिषद
३. आदिवासी विकासाची सैध्दांतिक भुमिका
४. आदिवासी जमाती

१९९५ - १-२. राणीपूर अभ्यास विशेषांक
३. कुपोषण विशेषांक ४. पर्यावरण विशेषांक

१९९६ - १. आदिवासी जमाती
२. महाराष्ट्र, ओरिसा आदिवासी अध्ययन
३. आदिवासी जमाती
४. आदिवासी शिक्षण

१९९७ - १-२. वारली लोकगिते व बोलीभाषा
३. पंचायत राज विशेषांक
४. साहित्य संमेलन विशेषांक

१९९८ - १. वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
२. आदिवासी व प्रशासन
३-४. आदिवासी समाज व संस्कृती

१९९९ - १. आदिवासी व आर्थिक धोरण
२. आदिवासी विकास व संस्कृती
३-४. बोर्डी परिसर अभ्यास

२००० - १. आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
२. स्त्रिया आणि आरोग्य
३. पाणी टंचाई आणी पाणलोट विकास
४. आदिवासी जीवन व संस्कृती

२००१ - १-२. अस्मिता व विकास विशेषांक
३. आदिवासी समाज व शासन
४. अस्मिता व विकास : दिशा २००१

२००२ - १. आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणी विकास
२-३. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : महाराष्ट्र
४. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : पर्यायी
उपाययोजना

२००३ - १-२. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : मध्यप्रदेश
३. आदिवासी समाज ४. आदिवासी संस्कृती

२००४ - १. पुस्तक परिचय

कष्टकरी जनता, भूषण भारता। वंदन करतो पददलिता।।

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
रामचंद्र मुटाटकर

# हाकारा

कार्यकारी संपादक
ग. शां. पंडित

वर्ष : पंचविसावे | जानेवारी - मार्च २००४ | अंक : पहिला

## ◆ अनुक्रमणिका ◆

### पुस्तक परिचय विशेषांक


| | | | |
|---|---|---|---|
| जननायक तंट्या भिल्ल | : | बाबा भांड | ३ |
| आम्ही आदिवासी वारली | : | महादेव सा. अंधेर | ७ |
| आगळी आंदोलने वेगळे आंदोलक | : | मालती गाडगीळ | १३ |
| गोंदणपाडा | : | वीणा आठवले | १७ |
| वारली लोकगिते | : | कविता महाजन | १९ |
| पिलपत्ती | : | अशोक कौतिक कोळी | २४ |
| आदिवासींचे कैवारी - खंडेराव सावे | : | मीना पाटील | ३१ |
| कातकरी | : | विजय साठे, बन्सी घेवडे | ३४ |
| हाकुमी व तांदळा | : | सुरेश व्दादशीवार | ३६ |
| संक्षिप्त पुस्तक परिचय | : | ग. शां. पंडित | ३९ |
| मुक्ता | : | प्रा. देवदत्त हुसळे | ४२ |
| यशोगामिनी | : | मेधा रानडे | ४४ |


◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११००७
दुरध्वनी - (०२०) २५८८४१५०

अंक मूल्य रू. २५/-

◆ **सहाय्य**
विदुला पुरोहित

◆ **अक्षर जुळणी**
मोनार्क प्रिंट आर्टस,
आरती परदेशी

◆ **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **मुद्रण स्थळ**
मोनार्क प्रिंट आर्टस, पुणे ३०

◆ **मुखपृष्ठ मांडणी**
मोनार्क प्रिंट आर्टस, पुणे ३०

अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

हाकारा'चा हा अंक **'पुस्तक परिचय'** विषयावर आधारित आहे. यात आदिवासी जीवनाची, त्यांच्या संस्कृतीची व समस्यांची ओळख तथाकथित आधुनिक संस्कृतीतल्या, शहरी अथवा पांढपेशी समाजाला व्हावी या हेतुने काही ग्रंथांची निवड केली आहे. २० व्या शतकाच्या अखेरीस व २१ व्या शतकाच्या सुरुवातीस आदिवासी जीवनाचा परिचय करुन देणारे साहित्य मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध झालेले दिसते. त्यामुळे आदिवासी समाज आता अनोळखी राहिलेला नाही, तर अधिक प्रकाशात येऊ लागला आहे.

भिल्ल, वारली, ठाकर, कातकरी, गोंड, माडिया, कोकणा या काही प्रमुख आदिवासी जमातींची ओळख या पुस्तक परिचयाच्यानिमित्ताने होते. याशिवाय इतरही काही जमातींचा उल्लेख यात आलेला आहे. हे सर्व साहित्य विविध प्रकारांमध्ये विभागलेले आहे. कादंबरी, कथा, लोकसाहित्य, चरित्र, आत्मचरित्र अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारांतून आदिवासी जीवन आपल्यापुढे उलगडत गेलेले दिसते.

स्वातंत्र्यपूर्व व नंतर निर्माण झालेल्या साहित्यात आदिवासी समाजाचे चित्रण हे अद्‌भूत स्वरुपाचे, बरेचसे रंजकतेकडे झुकणारे होते. त्यात वास्तवतेचा अंश नव्हता, असे म्हटले तरी फारसे वावगे ठरणार नाही. त्यामुळे आदिवासी समाजाचे वेगळेपण, त्यांचे मागासलेपण काहीसे इतर समाजाच्या समोर आले. मात्र विसाव्या शतकाच्या अखेरीस जे साहित्य प्रकाशात आले ते या समाजाच्या अभ्यासकांचे, समाज सेवकांचे होते. त्यांनी प्रत्यक्ष आदिवासी जीवन जे पाहिले ते व तसेच शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यात बहुतांशी प्रवास वर्णने. चरित्रे, आत्मचरित्रे यांचा अंतर्भाव होतो. ललित अंगाने लिहिलेले साहित्य हे काहीवेळा काल्पनिक व बरेचसे रंजनवादी असते; परंतु ललितेतर साहित्य मात्र बरेचसे प्रमाण शुद्धतेला उतरणारे, वास्तवतेला धरुन असते. त्यामुळे अशाच साहित्याची ओळख बहुतांशी या अंकातून होते. याशिवाय गावपातळीवर प्रत्यक्ष काम करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांचे अनुभव कथन असलेल्या पुस्तकांचा परिचय देखील यात आहे.

या अंकात सर्वच पुस्तकांचा सविस्तर परिचय देता येणे शक्य नव्हते. कदाचित यथावकाश पुढेही एखादा अंक या विषयावर काढता येईल. याशिवाय प्रत्येक अंकातून एखाद्या पुस्तकाचा परिचय सुद्धा देता येईल. मात्र यासाठी वाचकांनीच पुस्तके सुचवावीत अथवा परिचय लिहून पाठवावा.

**संपादक**

पुस्तक परिचय

पुरुषोत्तम आगाशे

# जननायक तंट्या भिल्ल

लेखक : बाबा भांड

एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीपासून ब्रिटिशांनी भारतीय उपखंडात आपले हातपाय पसरवायला सुरूवात केली आणि बघताबघता त्यांनी भारत भूमीवर बस्तान बसवले. राजे -महाराजे तसेच सरंजामशहांच्या मदतीने देशातील जनतेवर सत्ता गाजवण्यास सुरूवात केली. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या महसुली व्यवस्थेमुळे सामान्य जनतेची पिळवणूक होऊ लागली. हताश झालेल्या गरीब जनतेमध्ये ब्रिटिश साम्राज्याविरूद्ध लढण्याची ताकद वा बळ नव्हते. मात्र काही काही ठिकाणी अन्यायाविरूद्ध अल्प साधनांनिशी जिद्दीने अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी लढा दिला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अशा लढ्यांना जोर चढू लागला.

ब्रिटिश राजसत्तेविरूद्ध प्राणपणाने लढा देणारा असाच एक बहादूर म्हणजे तंट्या भिल्ल. तंट्याने सातपुडा परिसरातील दुर्गम अशा भौगोलिक परिस्थितीचा फायदा उठवत गनिमी काव्याने ब्रिटिशांशी एक दशकाहून जास्त काळ लढा दिला. अशा या महान आदिवासी जननायकाची जीवन कहाणी श्री. बाबा भांड यांनी वाचकांसमोर 1जननायक तंट्या भिल्ल2 या पुस्तकातून मांडली आहे.

अनेक आदिवासी वीरांनी ब्रिटिशांविरूद्ध लढा दिला. त्यामध्ये बिरसा मुंडा, भागोजी नाईक, कजरसिंग नाईक, भिमा नाईक, तंट्या भिल्ल यासारख्या शूरवीरांचा समावेश आहे. मात्र अपुऱ्या नोंदी, इच्छाशक्तीचा अभाव व अन्य कारणांमुळे इतर स्वातंत्र्य सेनानींसारखे या आदिवासींचे चरित्र लिखित स्वरूपात फारसे पुढे आलेले नाही. या पार्श्वभूमीवर बाबा भांड यांनी केलेले कार्य अनमोलच म्हटले पाहिजे.

राजस्थानातील विंध्य पर्वत, महाराष्ट्र, मध्यप्रदेश या राज्यातील सातपुडा पर्वत तसेच गुजरात राज्यामध्ये भिल्ल या लढाऊ आदिवासी समाजाची वस्तीस्थाने फार पूर्वीपासून आढळून येतात. सातपुड्याच्या डोंगर रांगातील एका खेड्यात तंट्याचा जन्म झाला. तंट्याच्या आजोबांची पोखरगाव मधील जमीन गावच्या पाटलाने कर्ज व व्याजात हडप केली. त्यानंतर तंट्याचे आईवडील बिरडा या गावी येऊन खंडानं जमिन करू लागले. मात्र दुष्काळी परिस्थिती व मालकाच्या तगाद्यामुळे तंट्याच्या कुटुंबाला हलाखीत दिवस काढावे लागले. अर्धपोटी राहून, जंगलातील कंदमुळं खात जगावे लागत होते. अशातच आजारपणामुळे तंट्याच्या आईचा मृत्यु झाला. दुःखाच्या भरात, कर्ज फेडण्याच्या काळजीने तंट्याचा बापही दारूच्या आहारी गेला व झुरत जाऊन मेला. पोरसवदा वयातच तंट्या पोरका झाला. आईबापाचे छत्र हरपले.

तंट्याचे मन गावात रमले नाही. त्याने पोखर गावात जाऊन पाटलाकडे आपली वडिलोपार्जित जमीन परत मागितली. मेहनत करून पाटलाचं कर्ज फेडायची तयारी पण दाखवली. मात्र पाटलाने कुभांड रचून तंट्याला गुन्हेगार ठरवलं.

एक वर्षाच्यासक्तमजुरीची शिक्षा भोगण्यासाठी तंट्याची रवानगी नागपूरच्या तुरूंगात करण्यात आली. तुरूंगातून सुटून परतल्यानंतर तंट्याने पुन्हा काबाडकष्ट करून सामान्यपणे जीवन जगण्याचा प्रयत्न केला. मात्र इंग्रज पोलिसांनी त्याला पुन्हा दुसऱ्या प्रकरणात गोवून तीन महिन्यासाठी तुरुंगात पाठवले.

शिक्षा भोगून परत आल्यानंतर तंट्या होळकरांच्या राज्यातील सिआरो या गावी बायकांपोरांसह मजुरी करून राहू लागला. मात्र तंट्याच्या शत्रूंनी येथे देखील त्याची पाठ सोडली नाही. परत एकदा शेजारच्या गावातील चोरीचा आळ तंट्यावर घेण्यात आला. अनुभवाने शहाणा झालेल्या तंट्याने सातपुड्यातील जंगलदऱ्यांचा आश्रय घेतला. पोलिसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी साथीदारांच्या मदतीने भटकंती सुरू झाली. मात्र पुन्हा एकदा पोखरच्या पाटलाने जमीन जुमला परत देतो अशी भलावण करून तंट्याला पुन्हा एकदा अटक करविली.

न्यायालयात खटला चालला. निर्दोष असूनही तंट्याला परत एकदा शिक्षा होणार होती. निकालाच्या आदल्या रात्री तंट्याने बिजनिया व दौल्या या साथीदारांबरोबर खांडवा तुरूंगातून पलायन केले आणि जंगलाचा आश्रय घेतला. अनुभवातून तंट्या शहाणा बनला. सावकार, पाटील, मालगुजार , इंग्रजी पोलिस यांच्यातलं साटंलोटं त्याच्या लक्षात आलं. त्यांनी आपल्यावर केलेल्या अन्यायाचा बदला आपण घेतलाच पाहिजे हा विचार करून ,मात्र त्यासाठी एकटं लढून उपयोगी नाही. तंट्याने साथीदार जमवायला सुरूवात केली. बघताबघता वीस-पंचवीस जणांची टोळी तयार झाली. इथूनच अन्यायी राजवटीविरूद्ध तंट्याचा लढा सुरू झाला. तंट्या भिल्ल अन्यायाने त्रस्त झालेल्या जनसामान्यांच्या आकांक्षांचे प्रतिक बनला.

निर्दोष असताना कट कारस्थान रचून तंट्याला अटक करण्यास कारणीभूत ठरलेल्या भुईफळाच्या हिंमत पाटलाच्या घरावर तंट्याने हल्ला केला. पळून जाणाऱ्या पाटलावर साथीदाराने गोळी झाडल्याने पाटील मारला गेला. पोलिसांपुढे तंट्याला पकडण्याचे आव्हान निर्माण झाले. इकडे तंट्याही धीट बनत होता. हंसवरा गावच्या सावकाराचा पैसा अडका पोलिसाच्या वेषात जाऊन लुटला. नर्मदा खोऱ्यातील शोषण करणाऱ्या सावकार ,मालगुजारांच्या घरावर हल्ला करून लूट करण्याचे सत्रच तंट्याने आरंभले मिळालेली लूट गरीब लोकांमध्ये वाटली जाऊ लागली. आदिवासी, शेतकरी, मजुरांना तंट्या आपला वाटू लागला. त्यांची हिंमत वाढू लागली तर पोलीस यंत्रणेची डोकेदुखी.

तंट्याला गागागावातून पाठिंबा मिळू लागला, गावातील खबरे बित्तंबातमी पुरवू लागले.

तंट्या एकाच दिवशी वेगवेगळ्या दिशांना असलेल्या गावातून लूटमार करत होता. संपूर्ण पोलिस यंत्रणा चक्रावून गेली होती. तंट्याच्या बंदोबस्तासाठी खास अधिकारी नेमले जात होते. दरवेळेस वेगवेगळी व्यूहरचना केली जात होती, तरीही तंट्याचा धूमाकूळ चालूच होता. निमाड, बैतूल, होशंगाबाद अशा २०० मैलाच्या जंगल व दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेल्या प्रदेशात तंट्याचा वावर होता.

तंट्याविरूद्ध कारवाई करण्यासाठी डेप्युटी जनरल ऑफ पोलिस हे नवीन पद सेंट्रल प्रॉव्हिन्समध्ये निर्माण करून त्याचे मुख्यालय खांडवा येथे करण्यात आले. हॅमिल्टन या गोऱ्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. त्याने स्थानिक लोकांच्या मदतीने ग्रामरक्षक पथके निर्माण केली. पोलिसांना हल्याची खबर मिळण्याची चोख व्यवस्था करण्यात आली.

मात्र गावावर हल्ला होत आहे असा निरोप एका गावातून येई व दुसरे गाव लुटले जाई. एकेकावेळी अनेक गावांवर एकदम हल्ला होत असे. धूर्त तंट्याने गनिमी काव्याने पोलिसांची योजना उधळून लावली होती.

तंट्या अत्यंत धाडसी होता. निरनिराळी सोंगं काढण्यात तर त्याचा हातखंडाच होता. कधी म्हाताऱ्याच्या भूमिकेत तर कधी हमाल व न्हाव्याच्या रूपात येऊन त्याने पोलिस अधिकाऱ्यांना चकित करून सोडले होते.

तंट्याच्या कारवायांमुळे बेजार झालेल्या पोलिसांनी पुन्हा एकदा त्याच्याविरूद्ध मोहिम उघडण्याचे ठरवले. त्यासाठी स्पेशल कमिशनर तंट्या ऑपरेशन हे नवे पद निर्माण करण्यात आले. तंट्याला लोकांचे पाठबळ आहे हे ओळखून जे गाव तंट्याची खबर पोलिसांना देणार नाही त्याविरूद्ध सामुदायिक दंड बसविण्याची कल्पना पुढे आली. मालगुजार-सावकारांवर तंट्याचे हल्ले सुरूच होते. शेवटी गावांवर दंड बसवला तर जनमत आपल्या विरूद्ध जाईल या भीतीने दंडाची योजना रद्द करण्यात आली.

1तंट्या पोलीस2 असे स्वतंत्र सैन्यदल तंट्याचा बंदोबस्त करण्यासाठी उभारण्यात आले. यात मध्य भारतमधील तसेच होळकर व इंदूर संस्थानातील सैनिक असे संयुक्त सैन्यदल उभारण्यात आले.

ब्रिटिशांनी नवीन मोहीम तंट्याविरूद्ध उघडावी आणि तंट्याने हुशारीने ती उधळून लावावी. असा तंट्या आणि पोलिसांमध्ये पाठशिवणीचा खेळ अनेक वर्ष चालू होता. सातपुड्याचा जंगल व दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेला प्रदेश, इंग्रज व होळकरांच्या राज्याची सीमा या सर्व गोष्टींचा तंट्याने पुरेपुर वापर करून घेतला व ब्रिटिशांना बेजार केले. होळकर संस्थानाची मदत देखील त्याला होत होती. ब्रिटिशांच्या दबावामुळे वरवर पाहाता होळकर तंट्याविरूद्ध कारवाई चालू असल्याचे दाखवत होते. आतून मात्र मदत करत होते.

तुरूंगातून पळून गेला त्यावेळेस तंट्याला पकडून देणाऱ्यास होळकरांनी २०० रूपयाचे बक्षिस जाहीर केले होते. ब्रिटिशांनी पण तेवढेच बक्षिस जाहीर केले होते. तंट्याच्या कारवाया दिवसेंदिवस वाढतच गेल्या तशी बक्षिसाची रक्कमही. शेवटी तर तंट्याला पकडण्यासाठी १०,५०० रूपये पंचवीसशे एकर जमीन देण्याचे ब्रिटिशांनी जाहीर केले होते.

सतत गनिमी काव्याने सातपुड्याच्या दऱ्याडोंगरातून लढत राहिलेला तंट्या थकू लागला. वय वाढल्याने पूर्वीसारखी धावपळ, दगदग सहन होईनाशी झाली. लवकर दम लागू लागला. दृष्टी कमजोर होऊ लागली होती, त्याला या सर्वांचा कंटाळा येऊ लागला होता.

होळकर सरकार तंट्याला आतून मदत करत होतेच. होळकरांबद्दल त्याला आदर होता. होळकर सरकारपुढे शरण जाऊन माफी मागावी, त्यांच्या दरबारी चाकरी करावी. ब्रिटिशांपेक्षा होळकरांना शरण जाणे चांगले असे विचार तंट्याच्या मनात येऊ लागले. होळकर महाराजांकडे मध्यस्थी करण्यासाठी तो विश्वासू व्यक्ती शोधू लागला.

खरगोन जिल्ह्यातील बाणेर गावचा गणपत राजपूत तंट्याच्या परिचयाचा होता. गणपतची बायको म्हणजे तंट्याची मानलेली बहीण. गणपतच्या मदतीने तंट्याने होळकरांकडे जाण्याचे ठरवले. मात्र पैशाच्या लोभापायी गणपतने घात केला. १८८९ साली राखी पौर्णिमेच्या सुमारास बहिणीकडे भेटीसाठी आलेल्या तंट्याला पकडण्यात आले. होळकरांकडून ब्रिटिशांनी

तंट्याचा ताबा घेतला.

तंट्यावर जबलपूरला खटला चालवण्यात आला. न्यायाधीशांनी तंट्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली. मात्र पोलिसांनी तंट्यावर आणखी एक खटला दाखल केला - भुईफळच्या पाटलाचा खून केल्याचा संदर्भात. पाटलाचा खून केल्याबद्दल तंट्याचा साथीदार बिजनियाला पूर्वीच फाशी देण्यात आले होते. न्यायाधीशांनी तंट्याला फाशीची शिक्षा सुनावली.

अकरा वर्षे सतत ब्रिटिश राजसत्तेविरूद्ध नेटाने लढणाऱ्या या भिल्ल वीराला ४ डिसेंबर १८८९ रोजी जबलपूर येथे फाशी देण्यात आली. एका महान क्रांतीवीराचा अस्त झाला.

श्री.बाबा भांड यांनी एका आदिवासी क्रांतीवीराचे चरित्र लिहून आदिवासी क्रांतीकारकांच्या दैदिप्यमान इतिहासाचे सोनेरी पानच उलगडून दाखवले आहे. यामुळे आदिवासी विषयक साहित्यात मोठी भर पडली आहे. तंट्या भिल्ल प्रमाणेच इतर आदिवासी क्रांतीवीरांचा इतिहास जगासमोर आणला गेला पाहिजे, त्यासाठी ' जननायक तंट्या भिल्ल ' हे पुस्तक निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

तंट्या भिल्ल हे पुस्तक वाचताना सोडवतच नाही. श्री. बाबा भांड यांनी ओघवत्या शैलीमध्ये तंटयाचा जीवनपट उलगडून दाखवला आहे. हे पुस्तक लिहिण्यासाठी त्यांनी अत्यंत कष्ट घेतल्याचेही पदोपदी जाणवते. त्यांनी तंट्याचे जीवन चित्रित करताना सेंट्रल प्रॉव्हिन्स अँड बेरार, बॉम्बे प्रॉव्हिन्स, इंदौर दरबार वगैरच्या पुरातत्व खात्यातील नोंदी , पोलीस खात्याची कागदपत्रे, न्यायालयीन दस्तऐवज या संदर्भाचा आधार घेतला आहे. म्हणूनच तंट्याचे चरित्र अतिशय जिवंत झाल आहे.

पुस्तकाच्या पूर्वार्धात तंट्याचे जन्माचे साल तसेच इतर सनावळींचा उल्लेख आढळून येत नाही. तसे असणे देखील स्वाभाविकच आहे. एका सुदूर आदिवासी खेड्यातल्या मुलाची जन्मतारीख एकोणिसाव्या शतकात कशी नोंदली जाणार? असो, मात्र ढोबळमानाने जन्माचे साल देता आले असते. तंट्याचा जन्म कोणत्या गावात , कोणत्या प्रांतात झाला याचा उल्लेखदेखील स्पष्टपणे आढळत नाही. तसेच काही ठिकाणी येणारी तंट्याच्या तोंडची बोलीभाषा देखील खटकते. या गोष्टी सोडल्या तर बाकी पुस्तक मात्र फारच प्रभावी व प्रवाही झालेले आहे.

श्री. बाबा भांड हे गेली अनेक वर्ष तंट्यावर संशोधन करत आहेत. या प्रयत्नातूनच प्रस्तुत पुस्तकाशिवाय तंट्यावर मराठीतून एक कादंबरी व इतर दोन पुस्तके तसेच इंग्रजी भाषेतील एक पुस्तक प्रकाशित झालेले आहे

आदिवासींची अस्मिता जागृत करून 'तंट्याभिल्ल ' या आदिवासी जननायकाच्या जीवनावर लेखन करून साहित्य रूपाने टिकवून ठेवणाऱ्या श्री.बाबा भांड यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

आदिवासी कार्येकर्ते , अभ्यासक, शिक्षक व इतरांनीदेखील आवर्जून वाचावे असे हे पुस्तक आहे.

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | :- | जननायक तंट्या भिल्ल |
| लेखक | :- | बाबा भांड |
| प्रकाशक | :- | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई |
| पृष्ठ संख्या | :- | १२७ |
| किंमत | :- | रू.४५/- |

(टीप:- हे पुस्तक महाराष्ट्राचे शिल्पकार या मालेअंतर्गत प्रकाशित करण्यात आले आहे.)

पुस्तक परिचय

पुरुषोत्तम आगाशे

# आम्ही आदिवासी वारली

लेखक : महादेव सा. अंधेर

महाराष्ट्रातील जंगल-दऱ्याखोऱ्यातून आदिवासी मोठ्या संख्येने राहात आहेत. आदिवासींमध्ये अनेक जमाती असून प्रत्येक जमातीची खास अशी वैशिष्ट्ये आहेत. आधुनिकीकरणाचा स्पर्श या जमातींना व्हायला लागला असला तरी देखील आपली संस्कृती, परंपरा या जमातींनी टिकवून ठेवल्या आहेत. मात्र यापुढील काळात आदिवासींची संस्कृती कितपत टिकून राहील अशी शंका मनात येते. बिगर आदिवासी समाजाने आत्तापर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या आदिवासींच्या वस्तीस्थानांकडे आपला मोर्चा वळवला आहे. मोठमोठ्या विकास प्रकल्पांमुळे होणारे विस्थापन, पर्यटन क्षेत्राचा विकास वगैरे सारख्या शासकीय धोरणांमुळे आदिवासीच उध्वस्त होऊ लागला आहे. त्यामुळे त्या रेट्यापुढे आदिवासी जमातींची सांस्कृतिक वैशिष्टये, रूढी, परंपरा, चालीरीती, पारंपारिक ज्ञान यासारख्या गोष्टींची नोंद होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे आदिवासी समाजाची अस्मिता जागृत होऊन समाज एकसंघ राहू शकेल व सांस्कृतिक आक्रमणाचा धैर्याने मुकाबला करू शकेल.

ठाणे जिल्ह्यात वारली जमातीचे लोक मोठ्या संख्यने राहातात. १९४०-५० च्या दशकात गोदावरी परूळेकरांनी वारल्यांना संघटित करून प्रस्थापितांविरूद्ध बंडाचे निशाण उभारले. त्यांनी या लढ्याची कहाणी 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकातून शब्दबद्ध केली आहे. तत्कालीन वारली समाजाच्या स्थितीचे दर्शनही आपल्याला त्यातून होते. १९५० च्या दशकात सौ. कुसुम नारगोळकर यांनी 'जंगलचे राजे' तर श्री. खंडेराव सावे यांनी 'द वारलीज्' हे पुस्तक इंग्रजीतून लिहिले. त्यानंतर वारली समाजावर फारसे काही लिखाण झालेले नाही.

'आम्ही आदिवासी वारली' हे पुस्तक श्री. महादेव अंधेर यांनी लिहून वारली समाजासबंधीच्या पुस्तकात आणखी महत्वाची भर घातली आहे. उपरोक्त पुस्तके वारली समाजात काम करणाऱ्यांनी लिहिली आहेत. श्री. अंधेर गुरूजी हे स्वत: वारली समाजातीलच असल्याने त्यांनी वारली समाजातील संस्कृतीचे अंतरंग अनेक बारकाव्यांसहित उलगडून दाखवले आहेत. म्हणूनच हे पुस्तक अत्यंत वाचनीय झाले आहे.

पुस्तकाच्या सुरूवातीच्या 'आमचे पूर्वज' या प्रकरणामध्ये नल, नील, वाली, सुग्रीव, शबरी, मारूती, एकलव्य या सर्वांपासून आदिवासींची निर्मिती झाली असल्याचे सांगितले आहे. त्याचबरोबर वाल्हू पाणबुड्या (वाल्मीकी ऋषी) व खासा पारधी (व्याधमुनी) हे दोन ऋषी कुलदैवत असल्याचे म्हटले आहे. वाल्हू पाणबुड्या हा दंडकारण्यात राहात होता व त्याला खोल पाण्यात बुडी मारण्याची कला अवगत होती. तो पाण्यातील शंख, शिंपले, मोती तसेच वनातील औषधे, फुले, फळे विकून गुजराण करत असे. तर कधी कधी वाटसरूंची लुटमार देखील करत असे. त्याची पापे खूप मोठी असल्याने त्याला यम लोकात सामावून घेणे शक्य नव्हते, म्हणून यमाने नारायणा(नारद) करवी त्याला तपश्चर्या करायला

लावली व वाल्हूचा वाल्मिकी बनला. अशा प्रचलित कथेपेक्षा वेगळी गोष्ट आपल्याला वाचायला मिळते.

श्री. अंधेर गुरूजी यांनी नारायण, हिरवा, हिमाय, दुरूंग, कणसरी, धरतरी, गावतरी या देवदेवतांबरोबर वारली समाजात प्रचलित असलेल्या एकूण पन्नास प्रकारच्या देवदेवता व दानव यांची नावे व वैशिष्ट्ये दिली आहेत. वारली समाजात अत्यंत महत्व असलेल्या नाराण(नारायण देव), हिरोबा, हिमाय, वाघाय, दुरूंग या कुलदैवतांच्या आख्यायिका आपल्याला 'आमची कुलदैवते' या प्रकरणातून वाचायला मिळतात.

जन्मापासून मृत्यूपर्यंत केले जाणारे निरनिराळे संस्कार व त्यावेळस केले जाणारे विधी, म्हटली जाणारी गाणी वगैरे गोष्टींची तपशीलवार माहिती 'वारली समाजातील विविध संस्कार' या प्रकरणातून आपल्याला मिळते. नाळ कापणे, झोळी बांधणे, जावळ काढणे, कान टोचणे, गुरू करणे बधावन (विवाह संबंध जोडणे) साखरपुडा, देज, घाणा कांडणे, नोत्र (आमंत्रण ) विडा बांधणे, सुडकी घेणे, लग्न मंडप, चवक लिहिणे, देव करणे, हळद लावणे, बासिंग मोडणे, लोण लखन, ओटी भरणे, घाण गाठी, लग्न लावणे, उंबर आणणे व इतर लग्न विधी तसेच मृत्यू झाल्यानंतर केल्या जाणाऱ्या सर्व विधींची अत्यंत तपशीलवार माहिती श्री.अंधेर गुरूजींनी करून दिली आहे. या वेगवेगळ्या धार्मिक प्रसंगी गाणी म्हटली जातात. मौखिक परंपरेने ही गाणी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे येतात. अशी अनेक गाणी व त्याद्वारे दिसून येणारे वारली समाजाचे भावविश्व आपल्याला श्री.अंधेर गुरूजींनी उलगडून दाखवले आहे.

वारली समाजात लग्नाच्या वेळेस घराच्या भिंतीवर तांदळाच्या पिठीने चौक काढण्याची पद्धत आहे. या प्रथेबद्दल सांगताना लेखक म्हणतो- परमेश्वराच्या नात्यानुसार नर नारी ही एकाच देवाची मुले असल्याने त्यांचे बहीण भावाचे नाते असते. मनुष्य संसाराच्या जोडीला बहीण भावाचे नाते चालत नाही. म्हणून चार दिशातून एकत्र आलेल्या चौकात कुलदैवत, इतर देवदेवता, सर्व आप्त, परिचित,सगेसोयरे, नातेवाईक , समाज यांच्या समक्ष भावाबहिणीचे नाते बदलून मनुष्य संसारासाठी निवडलेल्या जोडप्याला आशीर्वाद मिळावा अशा श्रध्देतून चवक लिहिला जातो. ही माहिती फारच उद्बोधक वाटते. या प्रकरणातून वारली समाजातील मृत्यू व त्यासंबधीच्या त्यांच्या कल्पना याबद्दल देखील माहिती मिळते. एखादी गरोदर स्त्री पोटात मूल असताना मरण पावली तर तिच्या पोटातून मूल बाहेर काढून नंतर तिच्यावर अंत्यसंस्कार केले जातात कारण असे केले नाही तर बाळंतपणाची मुदत पूर्ण झाल्यावर ती स्त्री हडळ होते अशी त्यांची श्रद्धा असते. अनेक जोडपी लग्नविधी न करता संसार करतात. अशा जोडप्यातील व्यक्ती मृत्यू पावली तर स्मशानभूमीवर रूईच्या झाडाबरोबर लग्नविधी करून अंत्यसंस्कार केला जातो.

वारली समाज आता स्थिर शेती करू लागला आहे. त्यामुळे शेतीशी संबंधित असे अनेक धार्मिक विधी केले जातात. धाड बांधणे (मळणीच्या कामाला सुरूवात करायच्या आधीचा विधी) ,कौली खाणे (पावसाळ्यात जंगलात उगवलेल्या भाज्या आणून खायला सुरूवात करायचा आधीचा विधी) ,नवे खाणे (नवा भात देवाला नैवैद्य दाखवून खाणे), रास करणे (मळणीनंतरचा धार्मिक विधी) यांसारख्या अनेक धार्मिक विधींची ओळख त्या वेळस म्हटल्या जाणाऱ्या गाण्यांसह श्री. अंधेर गुरूजी आपल्याला करून देतात.

या विधीतून आपल्याला निसर्गपूजक वारली समाज अधिक जवळून पहायला मिळतो. वारली समाजात साजऱ्या केल्या जाणाऱ्या नागपंचमी, मकरसंक्रांत, नवरात्र, दिवाळी, होळी या महत्त्वाच्या सणांची ओळखदेखील 'आमचे सणसमारंभ' या प्रकरणातून आपल्याला होते.

वारली समाजातील नवी पिढी हळूहळू साक्षर होऊ लागली आहे. आत्तापर्यंत मौखिक परंपरेनेच एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञान दिले जात असे. या मौखिक परंपरेचे महत्त्वाचे अंग म्हणजे लोककथा. लोककथांच्या माध्यमातून मनोरंजनाबरोबरच संस्कृतीची ओळख करून देण्याचे , वारसा परंपरा जतन करण्याचे तसेच जीवन अनुभवाचे शिक्षण देण्याचे काम होत असते. वारली समाजातही अनेक अलिखित स्वरूपातील लोककथा प्रचलित आहेत. श्री. अंधेर गुरूजींनी अशा लोककथांचा खजिना आपल्यासमोर खुला केलेला आहे. या कथा अत्यंत मनोरंजक आहेत.

त्यातील सीता जन्माची कथा पुढीलप्रमाणे:- काशी वनाशी (काशी वाराणशी) मध्ये कदरू भगत नावाचा ब्राह्मण रहात होता. त्याला सात मुले व एक मुलगी- कुमारी मांडेसर. मुलांची लग्ने करून कदरू भगत वनात निघून गेला. मुलगी अविवाहितच राहिली. वडिलांची संपत्ती मुलांनी उधळल्याने दारिद्रय आले. फारसे शिक्षण न झालेल्या मुलांनी लंकेत नोकरीसाठी जायचे ठरवले. सातही भाऊ निघाले. त्यांच्या मागोमाग कुमारी मांडेसर पण गेली. तिला त्यांनी सात मजली हवेली बांधून दिली य ते लंकेत जाऊन नोकरी करू लागले. एकदा रावणाची नजर कुमारी मांडेसरावर पडली. त्याने गोसाव्याचे सोंग घेऊन फसवले. कुमारी मांडेसर गरोदर राहिली. भावांना ही बातमी कळली. त्यांनी प्रत्येकाची परीक्षा घेतली. मात्र सर्वजण निर्दोष निघाले. कुमारी मांडेसरीने एका सुंदर मुलीला जन्म दिला व निघून गेली. सात भावांनी परतीच्या वाटेवर असताना तिला बघितले व आपल्याबरोबर घेऊन निघाले. वाटेत त्यांनी जनक ब्राह्मणाच्या बागेत त्या छोट्या मुलीला सोडले. निपुत्रिक असलेल्या जनकाने तिला आपली मुलगी म्हणून वाढवले. ही मुलगी म्हणजेच सीता.

अशा अनेक पौराणिक व इतर लोककथा लेखकाने शब्दबद्ध करून ठेवल्या आहेत. त्याचबरोबर वारली समाजात म्हटली जाणारी लग्नगीते, नृत्यगीते देखील आपल्याला वाचायला मिळतात.

मौखिक परंपरेचे आणखी एक अंग असलेली विविध कोडी 'आदिवासी उखाणे' या प्रकरणातून आपल्याला वाचायला मिळतात. ही कोडी अतिशय मनोरंजक असून त्यावरून वारली लोकांच्या कल्पकतेची झलक पहायला मिळते. एकूण छोटी छोटी ५३ कोडी या प्रकरणात देण्यात आली आहेत.

आदिवासी आणि जंगल यांचे अतूट नाते आहे. जंगलातून मिळणाऱ्या वनस्पतींचा वापर निरनिराळे आजार बरे करण्यासाठी केला जातो. पुस्तकाच्या शेवटच्या 'आमची औषधे' या प्रकरणात श्री.अंधेर गुरूजी यांनी निरनिराळ्या ५५ व्याधी / आजार यावर कोणकोणत्या औषधी वनस्पती कशा प्रकारे वापरली जातात) याची माहिती दिलीआहे.

'आम्ही आदिवासी वारली' हे वारली समाजाबद्दल माहिती देणारे छोटेखानी; पण सर्वसमावेशक पुस्तक म्हटले पाहिजे. या पुस्तकात वारली समाजातील कुलदैवते, विविध संस्कार, सणसमारंभ त्या प्रसंगी म्हटली जाणारी गाणी, लोकगीते , लोककथा , वनौषधी अशा वेगेवगळ्या

**( पृष्ठ १४ वर पहा )**

पुस्तक परिचय

पुरुषोत्तम आगाशे

# रानातली माणसं

लेखक : शेख सलीम अहमद

आदिवासींच्या संदर्भात गेल्या एक-दोन दशकांपासून साहित्य निर्मितीला वेग आला आहे. आदिवासींची गाणी, कविता, जमातींची माहिती, तसेच समस्या या विषयावर आता लिखाण बऱ्यापैकी होऊ लागले आहे. मात्र कथा किंवा लघुकथा या साहित्य प्रकारातून आदिवासींचे फारसे चित्रण झाल्याचे दिसत नाही. श्री. शेख सलीम अहमद यांनी आपल्या कथा 1रानातली माणसं2 या पुस्तकाद्वारे प्रकाशित करून साहित्याच्या प्रकारात मोलाची भर टाकलेली आहे.

श्री. सलीम शेख ठाणे जिल्ह्यामध्ये गेली ४० वर्ष वास्तव्य करून आहेत. या काळात त्यांचा निरनिराळ्या आदिवासी जमातींशी संपर्क आला, त्यांना आदिवासींचे जीवन जवळून पाहण्याची संधी मिळाली. त्यांनी आदिवासींच्या जीवनशैलीचे अत्यंत डोळसपणे निरीक्षण केले. त्यांच्या व्यथा जाणल्या आणि आदिवासींच्या परिस्थितीचे शब्द चित्रण आपल्यापुढे 'रानातली माणसं' या कथासंग्रहातून मांडली आहे. आपल्या कथांमधून श्री. शेख यांनी आदिवासींच्या जीवनाचे अनेक कंगोरे उलगडून दाखवले आहेत, तेही आदिवासींच्या बोलीभाषेचा वापर करत. म्हणूनच कथासंग्रहातील कथा वाचताना त्यातील व्यक्तीरेखा, परिस्थिती अत्यंत जिवंतपणे आपल्या डोळ्यासमोर उभी रहाते.

ठाणे आणि रायगड जिल्ह्यामध्ये कातकरी ही अत्यंत मागासलेली जमात मोठ्या संख्येने रहाते. कातकऱ्यांकडे कसण्यासाठी जमीन नसल्याने मजुरी करून गुजराण करणे हीच त्यांची दिनचर्या असते. कातकरी लोक पूर्वीपासून कोळसा पाडण्याचे काम करायची. कोळशाची भट्टी लावण्यात तर त्यांचा हातखंडा. मात्र आता कोळसा फारसा पाडत नसल्याने हे लोक आता वीट भट्टीच्या कामाकडे वळली आहेत. अति मागास असल्याने अन्य समाजांकडून कातकऱ्यांचे शोषण होतच आहे. अशा या कातकऱ्यांची व्यथा 'कातकरी परतले' आणि 'चाललो जगायला' या कथांतून मांडली आहे.

आषाढ महिना सुरू होतो. सर्व शेतकऱ्यांची शेतीच्या कामासाठी घाई सुरू असते. मात्र कातकरीपाडा शांत , भकासच असतो. मजुरीसाठी बाहेर गेलेले कातकरी अजून परतलेले नसतात. दिवस सरत जातात तरी कातकरी परतत नाहीत. म्हणून गावातली मंडळी कातकऱ्यांच्या नावाने शिव्या देत असतात. शेतकऱ्यांना मजुरीसाठी गड्यांची आवश्यकता असते. गावच्या किराणा दुकानदाराला आणलेल्या काळ्या गुळाच्या भेली कशा खपतील याची चिंता लागून राहिलेली असते, तर दारू गाळणाऱ्यांना आपली दारू कोण विकत घेईल या काळजीत असतात. सर्वांची भिस्त असते कातकऱ्यांवर. अखेर कातकरी येतात. येताना गाठीशी बांधून आणलेले चार पैसे असतात.

दारू खपायला लागते, काळा गूळ संपून जातो. आणि महिन्यादीड महिन्यातच कडकी येते. मजुरीचा भात आणून त्यावर जगणे सुरू होते. दारू

प्यायला देखील पैसे उरत नाहीत. आवणीचा हंगाम सुरू होतो. बाटलीभर दारू व भाताच्या आशेने दिवसभर ढोर मेहनत करून घेणारे शेत मालक. आवणी संपल्यावर कंदमुळं, खेकडे, मासे यासाठी केली जाणारी खटपट आणि पोटापाण्यासाठी पुन्हा एकदा गावात येणाऱ्या मुकादमाबरोबर जाणारे कातकरी. असे चित्रण 'कातकरी परतल' या कथेतून श्री. शेख यांनी अत्यंत प्रभावीपणे केले आहे. तर 'चाललो जगायला' या कथेतून त्यांनी अश्विन महिन्यापासून होणारे कातकऱ्यांचे सहकुटुंब स्थलांतर , मजुरीसाठी करावी लागणारी ढोर मेहनत, कंत्राटदार मुकादमांकडून होणारे शोषण हे विषय त्यांनी हाताळले आहेत.

कष्ट्या या कथेतून आदिवासींच्या दारिद्रयाचे तसेच त्यातही समाधान मानून आनंदाने जगण्याच्या त्यांच्या वृत्तीचा दृष्टिकोन आपल्याला बघायला मिळतो. कष्ट्या हा कथेचा नायक. बापाने प्रथा परंपरेला फाटा देऊन स्वत:ला जगण्यासाठी किती कष्ट करावे लागले व मुलाला किती कष्ट उपसावे लागणार आहेत याचा विचार करूनच बहुधा नाव ठेवले असावे. बांबू तोडताना पायात काटा घुसल्याने जखम चिघळल्याने दोन अडीच महिने घरीच बसलेला . फाट्याचा भारा विकून एखाद रूपया गाठीला मारून आणणारी त्याची बायको . आई काहीतरी खाऊ घेऊन येईल म्हणून वाट बघत असलेला बारक्या. आणलेल्या पीठाची ओतवली बनवून , पाणी पिऊन राहाणारं हे कुटुंब. बारक्याची भूक भागविण्यासाठी काहीतरी केले पाहिजे म्हणून कष्ट्या काठीचा आधार घेत लंगडत रानात जाऊन कडू कंद आणतो. परंतु कंदांनी काही भूक भागत नाही. बारक्याला घेऊन कष्ट्या पुन्हा दुसरे दिवशी निघतो, पहार घेऊन. शेतातली बिळं हेरून, सर्व बिळांची तोंड गवताने पेटवून देऊन पकडतो पंधरा वीस उंदीर. घरी आल्यावर बायकोला आनंद होतो, मात्र एवढे उंदीर एका वेळेस जास्त होतील म्हणून त्यातला वाटा शेजारच्याला आवर्जून देते. बायकोने बनवलेले उंदरांचं कालवण, शेजाऱ्यानं आणलेली मोहाची बाटलीभर दारू आणि आजचा दिवस चांगला साजरा झाला म्हणत सुखानं झोपी जाणारी ही मंडळी.

श्री. शेख यांनी पोटासाठी करावी लागणारी वणवण व आदिवासींचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अगदी वास्तवपणे चितारला आहे.

निरक्षर असला तरीही अत्यंत व्यवहार कुशलतेने वागणारा . जीवास जीव लावणारा, अत्यंत अगत्यशील, चांगला पाहुणचार करणारा असा लंगोटीवाला जान्या काका श्री. शेख यांनी अत्यंत सुंदरपणे चितारला आहे तीच गोष्ट सोमा या भोळ्याभावड्या आदिवासी शेतकऱ्याची.

'सरपंच फास घेतो' या कथेमध्ये अमृता महाला या भोळ्या भावड्या, निरक्षर आदिवासी सरपंचाची गोष्ट सांगितली आहे. अमृता हा स्वत:ची शेती पिकवून, वर्षभर खाऊन पिऊन सुखी असलेला शेतकरी. गावात ग्रामपंचायत स्थापन होते. अमृताच्या गुणांमुळे त्याची सरपंचपदी बिनविरोध निवड होते. कामासाठी तालुक्याच्या ठिकाणी येजा सुरू होते. गावात कोणीच साक्षर नसल्याने कागदपत्र वाचण्यासाठी ग्रामसेवकावरच अवलंबून रहावे लागते. गावासाठी दोन विहिरी मंजूर होतात. एका बाहेरच्या बेलदाराला विहिरींचे काम ठेक्याने दिले जाते. कामाला सुरूवात होते. बेलदाराला आगाऊ रक्कम दिली जाते. चार पाच दिवसांनी वडील आजारी

आहेत, म्हणून बेलदार निघून जातो, परत येतच नाही. महिने उलटतात. सरपंचाला वसुलीची नोटीस येते. गावात सरपंचाने पैसे खाल्ल्याची चर्चा सुरू होते. कायदेशीर कारवाई होण्याच्या भीतीने सरपंच आत्महत्या करतो. तो मेल्यानंतरही लोक कुजबुजत राहातात की त्यानं विहीरीचे पैसे खाल्ले होते.

जव्हार मोखाडा या भागात आजही बोहाडा हा सांस्कृतिक उत्सव गावागावातून मोठ्या प्रमाणावर आयोजित केला जातो. बोहाडा साजरा करण्याच्या पद्धतीचे सविस्तर चित्रण श्री. शेख यांनी आपल्या 'बोहाडा' या कथेमध्ये केलेले आहे व या बोहाडाच्या पार्श्वभूमीवर घडणारे कथानक रंगवले आहे. गावोगावी फिरून सोनारकाम करणारा गोपू सोनार, रूंग रूपाने देखणी असलेली मैना, गोपूचे तिच्यावर जडलेले मन, बोहाड्यामध्ये मैनेला भेटण्यासाठी आतूर झालेला गोपू व मैनेने त्याची केलेली फजिती या सर्वाचे चित्रण लेखकाने अगदी रंगतदारपणे या कथेतून केले आहे.

आदिवासी स्त्रीकडे बिगर आदिवासी लोक एक भोगवस्तू म्हणूनच पाहातात हे लेखाकाने या कथेतून सुचवले आहे, तसेच रतन या दुसऱ्या कथेतून पण.

रतन ही पारशी बाप व आदिवासी स्त्रीच्या संबंधातून जन्मलेली मुलगी. बघताबघता वयात येते. तारूण्यात प्रवेश केलेल्या रतनचे सौंदर्य कोणालाही आकर्षित करून घेऊ शकेल असेच असते. मात्र तिच्या आईला काळजी पडलेली असते तिच्या लग्नाची. आदिवासी समाजात रतनचा स्वीकार होऊ शकणार नाही, कारण ती पारशी बापाची पोर, तर उच्च वर्गीयात लग्न होणे कठीणच. या पार्श्वभूमीवर एका तरूण तलाठ्याशी झालेली रतनची भेट, दोघांमध्ये निर्माण झालेले आकर्षण. त्यातून आलेले गर्भारपण. तलाठ्याची बदली झाल्याने बसलेला धक्का, करावा लागलेला गर्भपात ,आलेले आजारपण यातून रतन सावरते न सावरते तोच हवालदार कायद्याचा बडगा दाखवून रतनला घेऊन जातो, बायको म्हणून ठेवण्याचे वचन देऊन. मात्र हवालदाराच्या वागण्याने रतनला आणखी एक धक्का बसतो. रतन हवालदाराच्या तावडीतून पळून जाते. कोणी म्हणतं तिनं जीव दिला तर कोणी म्हणतं रतन वेडी होऊन गावोगावी फिरत आहे.

'रान पळाले' या गोष्टीतून बेसुमार जंगलतोडीचा व त्यामुळे झालेल्या पर्यावरणाचा ऱ्हास याचा वेध कथानकातून लेखकाने अत्यंत सुंदरपणे घेतला आहे. सुगीचा हंगाम हा आदिवासींच्या आयुष्यातील कालचक्राची माहिती देणारा माहितीवजा लेखच म्हटला पाहिजे.

श्री. सलिम शेख यांची ओघवती शैली , बोली भाषेचा वापर करून केलेले लेखन, कथानक मांडण्याची हातोटी या गोष्टी वाखाणण्यासारख्या आहेत. आदिवासी जीवनाचा अनुभव घेत अत्यंत वास्तववादी चित्रण कथांतून केले असल्याने कथासंग्रह वाचनीय झाला आहे. या कथासंग्रहाने साहित्याच्या दालनात आदिवासींविषयक कथांची मोलाची भर घातली आहे.

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | :- | रानातली माणसं |
| लेखक | :- | शेख सलीम अहमद |
| प्रकाशन वर्ष | :- | २००३ |
| पृष्ठ संख्या | :- | ६९ |
| किंमत | :- | रू.५०/- |
| वितरक | :- | फ्रंटलाईन ट्रेडिंग मार्केटिंग अँड सर्व्हिसेस कचेरी रस्ता, पालघर (पश्चिम) जि. ठाणे. |

पुस्तक परिचय

पुरुषोत्तम आगाशे

# आगळी आंदोलने वेगळे आंदोलक

लेखिका : मालती गाडगीळ

भारतामध्ये एकूण लोकसंख्येच्या आठ टक्के एवढ्या प्रमाणात असलेला आदिवासी आजही दऱ्याखोऱ्यातून, रानावनातून राहाताना दिसतो. स्वातंत्र्य मिळून ५६ वर्ष होऊन गेली तरी सर्वसाधारण आदिवासी विकास प्रक्रियेपासून वंचितच ठरला आहे. एवढेच नाही तर तो या विकास प्रक्रियेत बळी जाणारी आहुती ठरला आहे. शहरांची वाढ, पाणीपुरवठा, रस्ते, धरणे, वृक्षतोड वगैरे एकांगी विकास कामांमुळे धनाढ्य, शहरवासी, स्वार्थी वर्गाचा फायदा झाला, मात्र जात्याच दुर्बळ असलेला , निस्वार्थी आदिवासी मात्र भरडला गेला. त्याचे शोषण आजही चालूच आहे.

निसर्गपूजक आदिवासी आजपर्यंत जंगलांचे रक्षण करत आला आहे. आपल्या गरजेपुरताच जंगलाचा उपभोग घेणारा आदिवासी ब्रिटिशांनी तयार केलेल्या व आजही तीच वननीती चालू ठेवणाऱ्या भारत सरकारच्या धोरणामुळे जंगलातील संसाधनांना वंचित झाला आहे. मोठमोठी धरणे, जलविद्युत प्रकल्प यांसारख्या मोठ्या विकास कामांमुळे पर्यावरणाची हानी झाली आहेच, त्याचबरोबर हजारो आदिवासींना विस्थापित देखील व्हावे लागले आहे. पुनर्वसनाच्या नावाखाली तोंडाला आश्वासनांची पाने पुसली गेल्याने आदिवासींना नैराश्य आले आहे.

आपल्या विरूध्द सतत होणारे अन्याय, शोषण याविरूद्ध आदिवासी जागा होऊ लागला आहे. संघर्षाची मशाल हाती घेऊन तो प्रस्थापितांना आव्हान देऊ लागला आहे, आवाज उठवू लागला आहे. आदिवासी व अन्य दुर्बल घटकांनी शासन व अन्य प्रस्थापितांनी चालवलेल्या विकास प्रक्रियेविरूद्ध जी आंदोलने उभारली, संघर्ष केला त्याची माहिती श्रीमती मालती गाडगीळ यांनी 'आगळी आंदोलने वेगळे आंदोलक' या पुस्तकातून करून दिली आहे. देशभरातील निरनिराळ्या आंदोलनांचा एकत्रित परिचय करून देणारे हे पुस्तक खरोखरच आगळेवेगळे म्हटले पाहिजे.

पुस्तकातील पहिल्या तीन प्रकरणातून मालतीबाई गाडगीळांनी आदिवासींचे जीवन, त्यांचे प्रश्न समस्या यांची ओळख करून दिली आहे. देशातील रहिवाशांमध्ये जशी विविधता आढळून येते तशीच विविधता आदिवासी जमातींमध्ये देखील पहायला मिळते. भिल्ल व इतर ग्रामीण जमाती शिकार करून जगणाऱ्या टोळयांच्या रूपाने बघायला मिळतात. आदिवासी जमातींमध्ये मातृवंश पद्धतीपासून ते पितृसत्ताक पद्धती अशा दोन परस्परविरोधी परंपरा आपल्याला पहायला मिळतात. म्हणूनच आदिवासी स्त्रीच्या स्वातंत्र्याबद्दल भाष्य करताना लेखिका म्हणते एक आदिवासिनी स्वच्छंदी असते तर दुसरी बंदिनी.

निरक्षर आदिवासींना आपल्या परिसराची जंगल, झाडे , वनस्पतींची अत्यंत सखोल माहिती असते, मात्र त्यांच्या या पारंपारिक ज्ञानाचा उपयोग वनखाते करून घेत नाही, अशी खंत लेखिकेने व्यक्त केली आहे.

आदिवासी भागात होणाऱ्या शिक्षण

क्षेत्रातील भ्रष्टाचारावर, नियोजनकर्त्यांच्या विवेकशून्य धोरणावर मालतीबाईंनी चांगलाच प्रकाश टाकला आहे. यासंदर्भात त्यांनी एक उदाहरण दिले आहे. उत्तर हिमालयातील एका गावामध्ये शाळा बांधण्यासाठी मोठी झाडे तोडून जागा साफ करण्यात येणार होती. मात्र गावातील स्त्रियांनी झाडे तोडायला विरोध केला. शेवटी गट विकास अधिकाऱ्याने ग्रामपंचायतीची सभा घेऊन सर्वानुमते विरळ झाडे असलेल्या जागेची निवड केली. आदिवासी मुलामुलींना केवळ लिहिण्यावाचण्याचे पाठ्यपुस्तकीय शिक्षण न देता त्या जोडीला व्यावसायिक शिक्षण देऊन स्वत:च्या पायावर उभे करावे अशी बहुमोल सूचना मालतीबाईंनी केली आहे. त्याचबरोबर वेठबिगारी, आरोग्य, दारू ,अंधश्रद्धा यासारख्या समस्यांचा देखील वेध त्यांनी घेतला आहे.

आदिवासींच्या कल्याणासाठी अनेक शासकीय योजना असतात, मात्र या योजनांचा लाभ आदिवासींना मिळतच नाही, निधी उपलब्ध असून वापरला जात नाही. एकीकडे असे चित्र असताना दुसरीकडे सरकारी खात्यातील कर्मचारी, अधिकारी झटून काम करीत असतात. अशा या शासकीय कारभाराचे चित्रण आपल्याला 'मदत कुणाची-मार्गदर्शन कुणाचे?' या प्रकरणातून वाचायला मिळते. ओरिसातील ओडेगांव येथे ७ हजार एकर जमिनीवर आदिवासींकडून झाडे लावून घेणारे व झाडे वाढल्यानंतर त्यापासून मिळणाऱ्या फळांवरचा हक्क आदिवासींना नाकारणारे वनखाते; त्याच राज्यातील रायगड जिल्ह्यात लहान पुलाचे संपूर्ण कंत्राट मिळवून , मेहनतीने पूर्ण करणाऱ्या आदिवासी महिला व त्यांना कामाचा संपूर्ण मोबदला न देता भ्रष्टाचार करणारे शासकीय अधिकारी यांसारखी उदाहरणे आपल्याला वाचायला मिळतात. तर दुसऱ्या बाजूला सागाच्या बियांची लागवड जलदगतीने लावण्यासाठी यंत्र तयार करणारे श्री. काकासाहेब चव्हाण; वन संवर्धन व संरक्षणासाठी आदिवासींच्या सहकार्याने प्रयत्न करणारे वनाधिकारी श्री. सोनावणे; आदिवासींच्या कारागिरीला उत्तेजन देऊन बनवलेल्या वस्तूंना तसेच वनोत्पादनाला बाजारात स्थान मिळवण्यासाठी प्रयत्नशील असलेली ट्रायफेड ही संस्था अशी आदिवासींसाठी झटणारी माणसे, संस्था यांची माहिती देखील आपल्याला वाचायला मिळते.

आदिवासी जंगल, दऱ्याखोऱ्यातून राहात असतात. हा भाग नैसर्गिक साधनसंपत्तीने विपुल असतो. ही साधन संपत्ती वापरण्यासाठी मोठमोठे प्रकल्प उभारले जातात. साहाजिकच आदिवासींचे विस्थापन हे ठरलेलेच. अशा या महत्त्वाच्या विषयावर मालतीबाईंनी ' विस्थापन म्हणजे विनाश 'या प्रकरणातून चर्चा केली आहे. ओरिसातील बल्लिआपल येथे सैन्याला लष्करी चाचण्या घेण्यासाठी जमीन उपलब्ध व्हावी म्हणून आदिवासींना विस्थापित व्हावे लागले. त्यांना कसत असलेल्या सुपीक जमिनीवर पाणी सोडावे लागले. छत्तीसगढमध्ये बाल्को कंपनीला ॲल्युमिनियमचा कारखाना काढायचा होता. त्याला केंद्र सरकारने परवानगी दिली. तेथील आदिवासींच्या जमिनीवर तो कारखाना उभा राहाणार होता. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अजित जोगी तसेच कारखान्यातील कामगारांनी देखील या योजनेला प्रखर विरोध केला. मात्र सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्याने आदिवासींचे विस्थापन अटळ झाले.

कर्नाटकात नगरहोले गावाजवळ पर्यटन केंद्र उभारण्यासाठी टाटा उद्योगसमूह व कर्नाटक शासन यांच्यात करार झाला. या प्रकल्पासाठी ४८,०००

आदिवासी व ग्रामीण जनतेला विस्थापित व्हावे लागणार होते. लोकांनी प्रखर विरोध केला. शासनाकडे विस्थापितांचे पुनर्वसन करण्यासाठी निधी नसल्याने जागतिक बँकेने कर्ज नाकारले. भुरिया समितीने देखील या प्रकल्पाला विरोध केला. अखेरीस हा प्रस्ताव बारगळला. उत्तरांचलमधील गढवाल येथे स्त्रियांनी चुन्याच्या खाणीच्या मालकाविरूद्ध संघर्ष करून दुसरा रस्ता शोधण्यास भाग पाडले. विस्थापनाची अशी अनेक उदाहरणे लेखिकेने आपल्यासमोर मांडली आहेत.

हिमालयातील उत्तरांचल हा प्रदेश मोठमोठ्या वृक्षांनी नटलेला, बहरलेला. या वृक्षांचे उपयोग देखील अनेक- इमारती लाकूड, क्रीडा साहित्य वगैरे साहाजिकच व्यापारी या भागाकडे आकृष्ट झाले. वनखात्याच्या मदतीने कंत्राटदारामार्फत जंगल भराभर तुटू लागले. त्याचे परिणाम स्थानिक लोकांना भोगावे लागले- वाहून जाणारी हजारो टन सुपीक माती, भूस्सखलन, नद्यांना येणारे पूर, पाणी टंचाई आणि त्यातूनच उभी राहिली ती चिपको चळवळ. सुंदरलाल बहुगुणा, चंडीप्रसाद भट व इतर कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली. हा हा म्हणता म्हणता ही चळवळ उत्तरांचलातील गावागावातून पोहोचली. लोकांनी कंत्राटदारांना झाडे तोडण्यास विरोध करायला सुरूवात केली. तसेच येथील महिलांनी नव्वदच्या दशकात रक्षासूत्र चळवळ सुरू केली. या दोन्ही चळवळींची माहिती मालतीबाईंनी निरनिराळ्या घटनांना सूत्रांच्या धाग्याने बांधत वाचकाला करून दिली आहे.

सुवर्णरेखा या बिहार, ओरिसा व बंगालमधून वाहणाऱ्या नदीवर धरणे बांधण्यात आली, त्या धरणांविरूद्ध आदिवासींनी केलेला संघर्ष 'सुवर्णरेखेभोवती लक्ष्मणरेखा' या प्रकरणातून लेखिकेने केला आहे. या मोठ्या प्रकल्पामुळे केलेला 'हो' या आदिवासी जमातीच्या लोकांना आपल्या जागेवरून विस्थापित व्हावे लागले व त्यामुळे त्यांची संस्कृती काळाच्या उदरात गडप झाली. प्रकरण वाचल्यानंतर विकास प्रक्रिया आदिवासींना कुठल्या टप्प्यापर्यंत नेणार आहे ? इतर प्रस्थापितांचा विकास म्हणजे आदिवासींचा विनाशच का? यासारखे अनेक प्रश्न उभे राहातात.

पुस्तकाच्या उत्तरार्धामध्ये नर्मदा नदीवर बांधली जात असलेली सरदार सरोवर व नर्मदा सरोवर ही दोन धरणे व त्याविरूद्ध सुरू झालेल्या नर्मदा बचाव आंदोलनाची ओळख लेखिकेने करून दिली आहे. या प्रकरणातून नर्मदा नदी, त्यावर होत असलेले धरण प्रकल्प, प्रकल्पासाठी येणारा खर्च (दिवसेंदिवस वाढत जाणारा), प्रकल्पामुळे होत असलेला व होणारा पर्यावरणाचा नाश, दोन्ही बाजूंचे दावे प्रतिदावे, नेमण्यात आलेला लवाद, प्रकल्पामुळे होणारे विस्थापन, प्रकल्पाविरूद्ध सुरू झालेले आंदोलन, आंदोलनातील निरनिराळे टप्पे यांसारख्या अनेकविध बाबींवर तपशीलवार माहिती आपल्याला मिळते.

शेवटच्या प्रकरणातून मालतीबाई गाडगीळांनी आंदोलनांबद्दल चर्चा केली आहे. त्या म्हणतात- या सर्व आंदोलनांचे मूळ नव्या अर्थव्यवस्थेत आहे. भारतात संपत्तीचे केंद्रीकरण होत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या, देशी मोठे उद्योजक व श्रीमंत शेतकरी, बागाईतदार यांच्या हातात उत्पादनाची साधने आहेत तर बहुसंख्य श्रमजीवी जनतेला मिळेल त्या आणि मिळेल तिथल्या भाकरतुकड्यावर जगावे लागत आहे. औद्योगिकरणाने आर्थिक विषमता वाढतच

चालली आहे. त्यामुळेच स्वत:च्या मागण्यांसाठी आदिवासी संघटित होऊन संघर्ष करत आहेत. आदिवासींचा सुधारणांना विरोध नसतो, त्यांना सुधारणा हव्या असतात मात्र विस्थापनाला विरोध असतो. स्थानिक आदिवासींना निर्णय प्रक्रियेत स्थान दिले, प्रस्तावित विकास विनाशकारक होणार नाही याची खबरदारी घेतली तर त्यांचे जीवन सुधारेल व राष्ट्रविकासाचे उद्दिष्ट पुरे होईल.

देशातील सर्व आदिवासींच्या न्याय्य मागण्या होण्यासाठी सर्व विभागातल्या आदिवासींनी व इतर मागास वर्गीयांनी एकत्र येऊन देशभर आंदोलन उभे करून सरकारवर दबाब आणला पाहिजे असा लढा उभारल्यास समाजात आमूलाग्र बदल होऊन सर्वांशी विचारविनिमय करून योजना आखल्या जातील व अंमलबजावणी होऊ शकेल असा आशावाद मालतीबाईंनी व्यक्त केला आहे.

देशभरातील निरनिराळ्या आंदोलनांची माहिती संकलित करून पुस्तकरूपाने प्रसिद्ध करून मालतीबाईंनी आदिवासीविषयक साहित्यात मोलाची भर घातली आहे. पुस्तकात देण्यात आलेली माहिती वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके यासारख्या स्त्रोतांवर आधारित असल्याने पुस्तकातील माहितीवर काही मर्यादा आल्याचे जाणवते. तरी देखील वयाच्या ८९ व्या वर्षी पुस्तक लिहिण्याचा मालतीबाईंचा उपक्रम अतिशय स्त्युत्य असा आहे.

आदिवासी व इतर जातीजमातींनी निसर्ग रक्षणासाठी व स्वत:च्या अस्तित्वासाठी चालवलेल्या संघर्ष मालतीबाई गाडगीळांनी शब्दबद्ध करून एकत्रितपणे वाचकांसमोर ठेवला आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच.

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | :- | आगळी आंदोलने वेगळे आंदोलक |
| लेखिका | :- | श्रीमती मालती गाडगीळ |
| प्रकाशक | :- | सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे ३० |
| प्रकाशन वर्ष | :- | २००२ |
| पृष्ठ संख्या | :- | १०६ |
| किंमत | :- | रू. ५०/- |

**( पृष्ठ ७ वरून पुढे )**

विषयावर माहिती दिली आहे. लेखक वारली समाजातीलच असल्याने त्याने अधिक तपशीलवार व सखोल माहिती मांडली आहे.

अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते यांना अत्यंत उपयोगी ठरू शकेल असे पुस्तक लिहिणाऱ्या श्री. अंधेर गुरूजी यांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे वारली समाजाची माहिती देणारे हे पुस्तक आदिवासीविषयक साहित्यामध्ये मोलाची भर घालणारे आहे. इतर आदिवासी जमातीतील समाजजीवनाची माहिती अशाच प्रकारे त्या त्या जमातीतील लोकांकडून साहित्य रूपाने प्रकाशित होणे अत्यंत आवश्यक आहे. अशा पुस्तकांसाठीची मुहुर्तमेढ श्री. अंधेर गुरूजींनी रोवली आहे, असेच म्हटले पाहिजे.

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | :- | आम्ही आदिवासी वारली |
| लेखक | :- | श्री. महादेव सा. अंधेर |
| प्रकाशक | :- | श्री. सुधीर अंधेर<br>सूत्रकार , पो. कर्झे, ता तलासरी |
| प्रकाशन वष | :- | २००१ |
| पृष्ठ संख्या | :- | १०९ |
| किंमत | :- | रू.५१/- |

पुस्तक परिचय

पुरुषोत्तम आगाशे

# गोंदणपाडा

लेखिका : वीणा आठवले

आदिवासी विषयक साहित्यामध्ये दिवसेंदिवस भरच पडत चालली आहे. अधून मधून आदिवासींच्या जीवनावरील कथा, व्यक्तीचित्रे, नियतकालिकातून वाचायला मिळत असतात. त्याच जोडीला आता कथासंग्रह देखील प्रसिध्द होऊ लागले आहेत. सौ. वीणा आठवले यांनी लिहिलेला 'गोंदणपाडा' हा त्यापैकीच एक कथासंग्रह.

आदिवासी जीवन, पर्यावरणाशी असलेले त्यांचे नाते, कष्टप्रद जीवन, हसतखेळत जगण्याची त्यांची दृष्टी, इतर समाज घटकांकडून होणारे शोषण, त्याच जोडीला समाजातील काही चांगल्या लोकांमुळे बाहेरचे जग बघण्याची , अनुभवण्याची मिळालेली संधी, समाज परिवर्तन घडवण्याची असलेली उर्मी तसेच आदिवासींच्या भावभावना वगैरेंचे दर्शन आपल्याला 'गोंदणपाडा' या छोटेखानी कथासंग्रहातून होते.

आपल्या पहिल्या कथेमध्ये 'सूर्व्या' या आदिवासी युवकाचे चित्रण केले आहे. 'सूर्व्या' हा बिट्टी पाड्यावरच्या रामा कातकऱ्याचा मुलगा. सतत कोणत्या ना कोणत्या कामात गर्क असणारा, पडेल ते काम करणारा, इतरांना मदत करणारा,म्हणूनच पाड्यावरच्या सगळ्या लोकांचा लाडका असलेला. निसर्ग, प्राणी मात्रांवर प्रेम करणारा, वाऱ्याच्या वेगाने धावणारा सूर्व्या टीव्हीवर जायची स्वप्ने बघत असतो आणि एक दिवस त्याचे स्वप्न पूर्ण देखील होते ते त्यानं संकटकाळात मदत केलेल्या शहरी मित्रांच्या मदतीने. एका कातकऱ्याचा पोर सूर्व्या धावण्याच्या शर्यतीत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतो; पहिला येतो. पाड्यावरची सर्व लोकं त्याचे ते रूप डोळ्यात साठवत असतात, कौतुक करत असतात. सरपंचानं भेट दिलेल्या टीव्हीवर बघून.

'सावळ्या' ही गोष्ट देखील अशीच. एका कातकरी वस्तीवर घडणारी. सावळ्या हा हरहुन्नरी चित्रकार. कुडाच्या भिंतीवर गेरू आणि तांदुळाच्या पीठानं चित्र काढणारा; होळी दिवाळीला पाड्यावरची घरं सजवणारा. एक दिवस वस्तीवर शहरी लोकं येतात, घराच्या भिंतीवरील चित्रकलेनं भारावून जातात. आदिवासींकडून चित्रं काढून घेऊन जातात. महिन्यानं पुन्हा येतात. सावळ्याला मुंबईला घेऊन जातात. तिथं त्याला बक्षिस मिळतं सावळ्या परत येतो. पाड्यावर सर्वांना आनंद होतो. सावळ्या बक्षिसाच्या रकमेतून वस्तीसाठी विहीर बांधतो. थोडे दिवस मजेत जातात. पुन्हा परत दारिद्र्याचे दिवस येतात. सावळ्या पेटून उठतो. कागद, रंग आणून सर्वांना कामाला लावतो, वस्तीचं द्रारिद्रय कायमचं मिटवण्यासाठी मिळालेलं सोन्याचं बक्षिस विकायचं ठरवतो.

'गोंदणपाड' या कथेत सदाभाऊ हा पाड्याचा पूर्णपणे कायापालट करतो. वर्षासाठी पाड्यावर रहायला आलेला सदाभाऊ लहान पोरांचा मास्तर बनतो. मुलांना शिकवतो, अभ्यासाची गोडी लावतो, शहाणं बनवतो. त्याच जोडीला गावातील लोकांकडे असलेल्या गोंदण कलेला प्रोत्साहन देतो. या कलेचा वारसा पुढील पिढ्यांनाही मिळावा म्हणून ही कला लहान मुलांना शिकवण्यासाठी मोठ्या माणसांना उद्युक्त करतो. पाड्यावर परदेशी लोकांना आणून या कलेची

ओळख जगाला करून देतो. लोकांच्या गोंदण कलेला वाव देऊन पाड्याच्या पूर्ण कायापालट करून टाकतो.

'साळा' या गोष्टीतून आपल्याला भेटतो तो शाळेत जाण्यासाठी धडपड करणारा शिवराम. वडिलांबरोबर बाजारात जाताना पाटी, पेन्सील, डबा, घेऊन शाळेत जाणारी मुलं पीहल्यावर शिवरामलाही शाळेत जावंसं वाटायला लागतं. मात्र घरच्या गरीब परिस्थितीमुळे आईवडील त्याला शाळेत पाठवायला तयार नसतात. वडील त्याला काही ना काही काम सांगायचे. मात्र त्याला शाळेची ओढ लागून राहिलेली असते. एक दिवस तो त्याच्या मित्राबरोबर शाळेत जातो. मास्तरांना धिटाईने शाळेत बसू का म्हणून विचारतो? मास्तर परवानगी देतात, मात्र आईवडिलांना एकदा पाठवून द्यायला सांगतात. शिवाला शाळेची गोडी लागते. तो स्वत:बरोबर पाड्यातल्या इतर मुलांनाही शाळेवर घेऊन जातो. मुलांना शाळेची गोडी लागते, स्वच्छतेचे महत्व कळतं. शाळेतील आरोग्य तपासणी व औषधोपचाराने मुलांमधील साथीचे आजार बरे होतात. शाळा मास्तर व शहरी पोरांच्या मदतीने गावासाठी कच्चा पण चांगला रस्ता तयार होतो, नीटनेटकी घरं बांधली जातात, पिण्याच्या पाण्याची सोय होते. शाळेमुळे गावाचा पूर्ण कायापालट होतो.

'सेतू' या कथेमध्ये मास्तरांनी सांगितलेल्या रामायणातील गोष्टीतून स्फूर्ती घेऊन स्फूर्ती घेऊन आदिवासी लोक गावाजवळून वाहाणाऱ्या नदीवर लाकडाचा पूल उभा करून आपला दैनंदिन प्रश्न कसा सोडवतात त्याचे शब्दचित्रण वीणा आठवले यांनी केले आहे.

'शेवंती' तसेच ' शिती' या दोन कथांमधून अपार मेहनत करून संसाराचा गाडा ओढणाऱ्या, आलेल्या संकटावर मात करणाऱ्या आदिवासी स्त्रियांचे प्रातिनिधीक रूप आपल्याला बघायला मिळते. लेखिकेने आदिवासींच्या जीवनातील छोटेछोटे प्रसंग बारकाव्यांसहीत चित्रित करून कथा फुलवत नेल्या आहेत.

आदिवासींचे शोषण अनेक वर्षांपासून होत आले आहे. केलेल्या कामाचे श्रेयदेखील त्यांना मिळू शकत नाही. अशाच एका उपेक्षित राहिलेल्या कातकऱ्याची कथा 'नाग्या पाथरवट' मधून आपल्याला वाचायला मिळते. दगड फोडून त्यावर नक्षीकाम करून गुजराण करणारे दगुडपाड्यातले कातकरी त्यांचा प्रमुख असतो. 'नाग्या पाथरवट' त्यांची कला बघून त्यांना आमत्रंण येते ते देवीचें मंदिर बांधण्यासाठी. नाग्या पाथरवट आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने दगडी मंदिर उभे करण्यासाठी झटून कामाला लागतो. तहानभूक विसरून सर्वजण जीव ओतून काम करतात. इंजिनियरने सांगितल्याप्रमाणे वर्षाच्या आत देवीचं मंदिर साकार करतात. सर्वांना काम केल्याचं समाधान मिळतं. नवरात्रात देवीची स्थापना होते, सत्कार समारंभ होतात. सर्वांची पाठ थोपटली जाते. ते मंदिर घडवणारे कातकरी मात्र उपेक्षितच राहातात. त्यांना ना देवीचे जवळून दर्शन होते ना कोणाची शाबासकी मिळते. आपल्या नशिबाचा भोग समजून ते आपला पगार घेऊन गावाच्या वाटेला लागतात.

पुस्तकामध्ये लेखिकेने आपल्या कथांमधून कातकऱ्यांचे जीवन चित्रण अतिशय रंजकतेने केले आहे. कथा परिणामकारक होण्यासाठी लेखिकेने ग्रामीण बोलीभाषेचा आधार घेतला आहे. मात्र ही भाषा कातकऱ्यांची वाटत नाही.

**( पृष्ठ २८ वर पहा )**

पुस्तक परिचय

# वारली लोकगीते

पुरुषोत्तम आगाशे

लेखिका : कविता महाजन

साहित्य हा संस्कृतीचा आरसा असतो असे म्हणतात कारण समाजजीवनाचे प्रतिबिंब साहित्यातून उमटत असते. फार पूर्वीपासून मौखिक परंपरेने साहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात राहिले आहे. रामायण, महाभारत ही महाकाव्ये या परंपरेची ठळक उदाहरणे म्हणून सांगता येतील. लेखन कौशल्य व छपाईचे तंत्रज्ञान अवगत झाल्यावर पारंपरिक साहित्य लिखित स्वरूपात प्रकाशित होऊ लागले. मात्र साक्षर असणाऱ्या लोकांपुरतेच हे साहित्य मर्यादित राहिले.

प्रत्येक आदिवासी जमातींची स्वतंत्र अशी बोलीभाषा आहे. आजच्या घडीला देखील आदिवासींमध्ये साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प असल्याचेच दिसून येते. मात्र असे असले तरी आदिवासी भाषांमध्ये साहित्याचे आगळे व विपुल भांडार आहे. या साहित्यातून आदिवासी संस्कृतीची वैशिष्टये, समाजजीवन, त्यांचे अनुभव विश्व, भावभावना, परिसरातील निरनिराळया गोष्टींकडे पाहाण्याच्या दृष्टिकोन वगैरेचे दर्शन घडते. मौखिक परंपरेद्वारेच या गोष्टींचे जतन केले जात आहे. मात्र काळाच्या ओघात, जुन्या जाणत्या आदिवासींबरोबरच ही परंपरा लयास जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच आदिवासींच्या मौखिक परंपरेचा वारसा लिखित स्वरूपात जतन करून ठेवणे गरजेचे बनले आहे.

या दिशेने प्रयत्न करण्याच्या दृष्टीने केंद्रिय साहित्य अकादमीने १९९६ मध्ये आदिवासी भाषा साहित्य प्रकल्पांची स्थापना केली. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आदिवासी भाषांतील मौखिक परंपरेत चालत आलेले उपलब्ध साहित्य प्रकाशात आणण्यासाठी त्याचे दस्तऐवजीकरण करून ते प्रकाशित करणे हा आहे. ह्या प्रकल्पाचाच भाग म्हणून 'वारली लोकगीते' हे कविता महाजन यांनी संपादित केलेले पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे.

वारली ही आदिवासी जमात प्रामुख्याने ठाणे जिल्हा ,नाशिक जिल्ह्याचा काही भाग, दमण व गुजराथ मधील काही जिल्ह्यातून ( जे महाराष्ट्राच्या सीमेला लागून आहेत) आढळून येतो. प्रस्तुत पुस्तकामध्ये ठाणे जिल्ह्यातील वसई, वाडा, भिवंडी या मुंबईजवळ असलेल्या तीन तालुक्यांतील लोकगीतांचा समावेश करण्यात आला आहे.

पुस्तकाच्या सुरूवातीला लेखिकेने प्रस्तावना लिहून लोकगीतं संकलनाची प्रक्रिया , आलेले अनुभव , अडचणी, लोकगीतांचं केलेलं वर्गीकरण याबाबतची भूमिका मांडली आहे. या लोकगीतांचे संकलन करताना लेखिकेच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले. मराठी भाषेत व वारली भाषेत काही शब्द सारखे आढळत असले तरी अर्थ मात्र निरनिराळे असतात. असे का ? ५० वर्षांपूर्वी वापरले जाणारे शब्द मराठीतून हद्दपार झाले असले तरी त्यांचा वापर वारली बोली भाषेमध्ये होत आहे. असे का? त्यांचे पुनवर्सन मराठीत पुन्हा करता येईल का? कशा रीतीने? वारली ही बोली आहे का? ती स्वतंत्र आदिवासी बोली आहे की मराठी भाषेच्या अनेक बोलींपैकी एक? यांसारख्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी अधिक खोलवर जाऊन अभ्यास करण्याची गरज आहे. लोकगीतांचा विचार करताना बोलीभाषेचा तसेच आदिवासींच्या सामाजिक विश्वाचा विचार देखील केला पाहिजे, तरच

आपल्याला ती गीते नीटपणे समजून घेता येतील असे मत लेखिकेने मांडले आहे. जसजसे आदिवासी इतर लोकांच्या संपर्कात येत आहेत, नवनवीन अनुभव घेत आहेत तसतसे त्यांच्या लोकगीतांमध्येही त्याचे प्रतिबिंब उमटत आहे, असे निरीक्षण लेखिकेने नोंदवले आहे.

वारली लोकगीतांचे लेखिकेने एकूण तेरा विभागात वर्गीकरण केले आहे. यामध्ये जन्मापासून ते मृत्यूपर्यंत आयुष्यातल्या विविध प्रसंगावर आधारित गीते, सणांची, नृत्यांची गीते वगैरेचा समावेश आहे. ही सर्व लोकगीते वारली बोलीभाषेमधून जशी म्हटली जातात तशीच दिलेली आहेत. त्याचबरोबर प्रत्येक गीताचा मराठी भावानुवाद लेखिकेने दिला आहे, काही वारली शब्दांचे अर्थ देखील दिले आहेत. त्यामुळे प्रत्येक गीताचा अर्थ सहजसुलभपणे वाचकाला समजतो आणि वारली लोकगीतांचे अंतरंग उलगडत जातात.

वारली समाजामध्ये मूल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी पाचवीची पूजा केली जाते. यादिवशी रात्री 'सटी' येऊन बाळाचे जन्मापासून ते मृत्यूपर्यंतचे भविष्य कपाळावर लिहून जाते असा वारली लोकांचा समज आहे . याप्रसंगी अनेक गाणी गायली जातात. त्यातील एक गाणे पुढीलप्रमाणे:-

सटेचा सटकारा ब्रह्म्याचा लिव्हना
सटीब्रह्म्या आला बालंतिनीचे ओटीवं
बालंतिनीनं ओटा सारवेला सुरवेला
सटीब्रह्म्याचे मनाला खुशी गं झाला
बालाचा अगसेर कथं लिव्हेला
बालाचा अगसेर डोकी लिव्हेला

(अगसेर -अक्षर)

या गाण्यातून 'सटी' बाळाचे भविष्य कसकसे लिहिते ते सांगितले आहे. पाचवीच्या प्रसंगी बाळंतपणाविषयती इतरही गाणी गायली जातात ती आपल्याला 'पाचवीची गाणी' या विभागात वाचायला मिळतात.

अंगाई गीते हा काव्य प्रकार सर्व समाजातून, बोली भाषातून आढळून येतो. वारली समाजात देखील अशी अनेक जीते प्रचलित आहेत. या गाण्यातून मुख्यत्वे लहान बाळ व मुलांना आवडणाऱ्या पाळीव प्राण्यांचा उल्लेख आढळून येतो. लेखिकेने संकलित केलेल्या अंगाईगीतांपैकी एक गीत पुढीलप्रमाणे:-

बाळाचे गायी गेल्या आंबरायी
बाळाचे गायी गेल्या गोठणीवं
बाळाचे गायी गेल्या धसाधसा
बाळाला नूनू पसापसा
बाळाचे गायी गेल्या गोठीयात
बाळाचे दूदू लोटीयात

काव्य हा वारली समाजाचा अविभाज्य भाग असल्याने लहान मुलांवरही त्याचे संस्कार होतात. म्हणूनच खेळगीतांच्या रचना देखील आपल्याला बघायला मिळतात. या गीतांमधून लहान मुले व त्यांच्या खेळांविषयी माहिती मिळते. फुगडीचा जिखणाँ (फुगडीचे उखाणे) हा एक असाच काव्य प्रकार . उखाण्यातून मुली एकमेकींना चिडवत असतात. त्यातून घडीभर करमणूक पण होते. लेखिकेने असे अनेक उखाणे या संग्रहात संकलित केलेले आहेत. त्यापैकी काही उखाणे पुढे दिले आहेत.

माझे वाटीत आवलं ग आवलं
कलूला झालं कावलं ग कावलं

माझ्या अंगावं येशील ग येशील
माझी सवत होशील ग होशील

लग्न हा आयुष्यातला एक महत्त्वाचा विधी, अत्यंत आनंदकारक म्हणूनच याप्रसंगी नाच, गाणी यातून आप्त , परिचित कुटुंबिय आपला आनंद व्यक्त करत असतात. वारली समाजात देखील इतर विधिगीतांच्या तुलनेत याप्रसंगी म्हटली जाणारी गाणी विपुल संख्येने आढळतात. लेखिकेने सुमारे ६० गाण्यांची नोंद या पुस्तकात केली आहे. लग्नांच्या गाण्यांचे वर्गीकरण लेखिकेने पुढीलप्रमाणे केले आहे.

(अ) धवलेरी लग्न लावताना म्हणते ते मुख्य गीत व सुलग्नाचं गाणं

(ब) विधींशी निगडीत पारंपरिक गाणी- तेलवाणाची, हळदीची गाणी

(क) प्रासंगिक गाणी- लग्न-माहेर, सासर, कुटुंब, नातेसंबंध वगैरे विषयावरची

(इ) कथा गीतं- कौटुंबिक , सामाजिक व पौराणिक विषयावरची.

लग्नाच्या गाण्यापासून निरनिराळे प्रसंग चित्रित केलेले आढळतात. त्यातून निरनिराळे नातेसंबंध,भावभावना याचे दर्शन घडते.

मुलीला सारा जन्म सासरीच काढायचा असतो. आईवडील, भाऊबहीण हे सर्वजण दोन दिवसाचे सोबती असतात, म्हणून मुलीने नीट वागावे असा सल्ला गाण्यातून दिलेला आढळतो. त्याचे एक कडवे असे-

रेखा सावर ग सावर, तुझी उलटा पदर वरचेवर
रेखा आस ग आस,तुझी आस दोन दिवसांची
रेखा सासू ग सासू तुझी आहे जन्माची

(उलटा पदर- गुजराथी पध्दतीचा पदर, आस- आई)

माहेरच्या लोकांनी लाड केलेल्या मुलीचे व माहेरच्यांच्या प्रेमाचे दर्शन काही गाण्यातून दिसून येते त्याचे कडवे पुढीलप्रमाणे-

बारीक पोवला मोत्यानं ओवला
आमची नवरी लहान ग
हलू हलू हळद लावा
तिचे आईनी केले लाड ग

याचबरोबर सासू-सून या नात्याची ओळख देखील गीतातून होते. वारली समाजात 1देज 2ची (वधूमूल्य) प्रथा प्रचलित आहे. मुलाकडची मंडळी मुलीच्या वडिलांना देज देऊन मुलगी आणतात. अशा सुनेला उद्देशून सासू म्हणते-

सुनेबाई दार जनी लागे जं
तुजसाठी गोठं केलं रीत वं
आमचं गोठं भरून देई वं
सुनेबाई दार जनी लागे जं
तुजसाठी कणगं केलं रीतं वं
आमचं कणगं भरून देइ वं

लग्नाच्या वेळेस म्हटल्या जाणाऱ्या गाण्यांतून विवाहितेची कैफियतदेखील मांडलेली दिसून येते.

बंधूच्या पारावरी नारली बाग लावेला
नारली बाग लावेला, नारली डोला देती
तेठ नारली डोला देती
मी पतीला सांगू किती
माझ्या चोळीच्या झाल्या वाती

( डोला देती- डोलतात- चोचोळीच्या वाती होणे- विन्नावस्था होणे.)

यांसारख्या अनेक गीतातून लेखिकेने आपल्याला वारली समाजजीवनाचे, नातेसंबंधांचे, भावभावनांचे अत्यंत जवळून दर्शन घडवले आहे. वारली समाजातील लग्न संस्थेविषयी पूर्ण माहिती या

गीतांतून मिळते.

नागपंचमीच्या वेळी म्हटली जाणारी दोन गाणी लेखिकेने दिली आहेत. मात्र गाणी फारशी गायली जात नाहीत असे निरीक्षण नोंदवले आहे. नागपंचमीनंतर गौरी नाच सुरू होतो आणि त्यावेळेस निरनिराळी गाणी म्हटली जातात.

गौरीच्या गाण्यांमध्ये गौरीचे नमन, गण, कथा, तिचे आगमन, कृष्ण, राम, शंकर या देवांची गाणी यांचा समावेश आहे. त्याशिवाय इतर अनेक गाणी आहेत ज्यामधून स्त्री- जीवनाच्या विविध पैलूंचं ,सुखदु:खाचं दर्शन घडतं, तसंच त्याच्या हिंमतीचं देखील . मुलीची छेड काढणाऱ्या मुलाला उद्देशून मुलगी म्हणते-

असा एरंड माजला
वईचे उच्च गेला गं
असा वारल्याचा पोरा
असा वारल्याचा पोरा
तू धमकावसी कोन्हाला रं
असा धरीन मानंला
न फिरवीन गरगरा रं
(वई- कुपंण)

निरनिराळे विषय असलेली एकूण ६७ गौरी नाचाची गाणी पुस्तकात दिली आहेत. गाणी वाचताना त्यात मन रमून जातं. या गाण्यांमधून वारली समाजात स्त्री-पुरूषांचे नाते कसे असते, त्यांचा एकमेकांकडे बघण्याचा दृष्टीकोन याची माहिती देखील या गौरी नाचाच्या लोकगीतातून मिळते.

पावसाळ्यात कांबड नाच केला जातो. सोंग, गाणी व नृत्य या तीन अंगांचा वापर या नाचात केला जाते. या गाण्यातून देवदेवतांना आवाहन , पावसाची आळवणी केली जाते. तसेच विनोदी, गमतीदार गाणीसुध्दा असतात. काही गाणी अश्लीलही असतात. कांबड नाचाची ३३ गाणी लेखिकेने पुस्तकात दिली आहेत. याचबरोबर मांदल नाचाची, घोर नाचाची गाण्यांचा समावेश देखील करण्यात आला आहे.

होळी हा आदिवासींचा महत्त्वाचा सण. त्यावेळेस गायन नृत्याला अगदी उधाण येते. त्यावेळेस वारली महिला पारंपरिक लोकगीते म्हणतात. होळीच्या शृंगाराचे गीत गायले जाते, ते असे-

होलूबायला शिणगार कशाचा गं केला
होलुबायला शिणगार कुंकवाचा गं केला
होलुबायला शिणगार कशाचा गं केला
होलुबायला शिणगार बांगड्यांचा गं केला-
--

आदिवासी माणूस म्हणजे ढोर मेहनत करणारा. मात्र काम करत असतानादेखील तो आनंदी असतो. गाणी गाऊन श्रमाचा भार हलका करायचा प्रयत्न करतो. वारली श्रमगीतांना 'हैसाची गाणी 'असे म्हटले जाते. जंगलातून मोठमोठी झाडं तोडून त्यांचे ओंडके वाहून आणताना ही गाणी म्हटली जातात. पुरूषच ही गाणी म्हणतात. या गाण्यांचे विषय अत्यंत हलके फुलके असतात. उदाहरण म्हणून एक श्रमगीत पुढे दिले आहे-

सागाची दिमकी हैसा गो हैसा
एक जोर मारा गो हैसा गो हैसा
खरकत ताना गो हैसा गो हैसा
जोराशी ताना गो हैसा गो हैसा
माल्हानाव न्या तुम्ही हैसा गो हैसा
थप्पीला लाग तुम्ही हैसा गो हैसा
(दिमकी-ओंडका,माल्हनावं- माळावर)

लोकगीतांचा आणखी एक प्रकार म्हणजे 'बायांची गाणी'. वर्षानुवर्षे दऱ्याखोऱ्यातून राहिलेल्या

आदिवासींच्या आजाराबद्दल काही ठाम अशा धारणा, संकल्पना आहेत. कांजिण्या, गोवर, देवी यासारखे साथीचे आजार देवदेवतांच्या कोपामुळे होतात असा त्यांचा समज आहे. त्याला ते 'बाया आल्या' असे म्हणतात. आजारी माणून बरा होण्यासाठी धार्मिक विधी केले जातात त्यावेळेस काही गाणी गायली जातात. लोकगीते लेखिकेने या संग्रहात समाविष्ट केली आहेत. ही गाणी मिळवणं फार अवघडं होतं. जर का ही गाणी विनाकारण गायली तर देवाचा कोप होऊन मुलं आजारी पडतील अशी भीती लोकांना वाटत होती, असे लेखिकेने आपल्या प्रस्तावनेत नमूद केले आहे.

कोणालाही न चुकलेले मृत्यू एक मोठे कोडेच आहे. हे कोडे सोडवण्याचा प्रयत्न आदिवासी आपल्या परीने करताना आढळतात. वारली समाजात मृत्यूनंतर अकराव्या-बाराव्या रात्री जागरण करून गाणी म्हटली जातात. या गाण्यात जीवन-मृत्यूचे तत्वज्ञान सांगितलेले असते. प्रदीर्घ असे कथानकही असते. जीवनाविषयी भाष्य करताना एका लोकगीतात म्हटले आहे-

बांगड्या फुटं तं काच राया दिसते
आपला जीवडा पाण्याचा बुडबुडा
फुट्टा जातां , बिघडला नातां---

ही सर्व लोकगीते वाचत असताना आपण स्वत:ला हरवून जातो. पुस्तकाच्या लेखिका कविता महाजन यांनी लोकगीते संकलित करून एक मोठा खजिना वाचकांसमोर ठेवला आहे. ही गीते केवळ लोकगीते नसून त्यातून आपल्याला वारली लोकसंस्कृतीचे परिपूर्ण दर्शन होते. वारली समाज जीवनातल्या प्रत्येक टप्प्याकडे कशा दृष्टीने पाहातो, त्याचे समाजजीवन कसे आहे , तो इतर लोकांना कशा नजरेने बघतो, त्याचे अनुभव काय आहेत या सर्व गोष्टीचा उलगडा पुस्तक वाचल्यावर होतो.

वारली लोकगीतांचा संग्रह संकलित करून कविता महाजन यांनी आदिवासी साहित्यात मोलाची भर घातली आहे . हे संकलन एका विशिष्ट भागात , कालखंडात झाले आहे. अशाच प्रकारचे संकलन जर अन्य भागातल्या वारली समाजात करता आले तर भौगोलिकदृष्ट्या वेगळा असलेला समाज कशा प्रकारे विचार करतो, त्यांच्यामध्ये काही भिन्नता आढळते का असा तुलनात्मक अभ्यास करता येऊ शकेल. तसेच याप्रकारे जर का ठराविक कालावधीनंतर नियमितपणे संकलन होत राहिले तर या लोकगीतंमध्ये होत जाणारा बदल कळू शकेल.

पुस्तकामध्ये वारली बोलीभाषेत तसेच मराठीमध्ये लोकगीते दिली असल्यानें गाण्यांचा अर्थ समजून घ्यायला कोणतीही अडचण येत नाही.

असे हे अत्यंत मौलिक काम करणाऱ्या कविता महाजन तसेच साहित्य अकादमीचे आभार मानावे तितके थोडे आहेत.

आदिवासी संशोधक , अभ्यासक, कार्येकर्ते यांनी आवर्जून वाचावे असे हे पुस्तक आहे.

■ ■ ■

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | :- | वारली लोकगीते |
| लेखक | :- | कविता महाजन |
| प्रकाशक | :- | साहित्य अकादमी, नवी दिल्ली |
| प्रकाशन वर्ष | :- | २००० |
| पृष्ठ संख्या | :- | २५१ |
| किंमत | :- | ८०/- रूपये |

कथा

# पिलपत्ती

■ अशोक कौतिक कोळी

"चाल रे ऽ भो ऽऽ गरादादा ऽऽ ... झालं नही का तुध्ये आझुन? गाडी युन उभी राहाली... उरकंव लवखर ...!"

आवाज देल्हा आन् दिन्याभू पुढे गेल्हा. थामला सुद्धा नही. बोलता बोलता पुढे निंघुन गेल्हा. गरा घाई कऱ्याले लागला. लेकीले बोल्याले लागला,

"उरकवं मटे चटकन ! राडी घालू नको. चुल्ह्यावऱ्हची भाची उल्ह्यावर ठिवतावा ठयून भाकर टाक."

"हावनं रे ऽ बाप्पाऽ ! करते नं... यवढी काय घाई करू राहाला," मटी.

"मी कशाला घाई करू? तो दिन्याभू बोल्हावून गेल्हा. आयकलं नि का तुन्हं?"

"हांऽ ! आयकलं ... म्हणून तं आभ्यास सोडून पीठ गायाले बसली."

गरा गप झाला. मटीनं काड्या लोटून जाळ दनकावला. उन्ही घ्यून भाकर थाप्याले लागली. तपला तावा लालजरद. पोरनं फटक्यात भाकर टाकली. गराचा चेहरा भाकरच्या पोपड्यावानी फुल्ला. पुढे सरकून बसला. ताटलीत भाजी घेतली. पराल्हीस भाकर पोपडा काढुन मोडली. लागला खायाच्या नांदी. वचंवचं.

मटी लव्हलव्ह रांधत व्हती. घाई करत व्हती. तरफडया तरफड्यामधी तिचं बोट जगुन गेलं ताव्याचा चटका लागला. जीवाचा कातोडा कऱ्याले लागली. पाण्यात हात घाल्याले लागली. गराचा जीव जाईन, आसं वाटलं व्हतं. तं तो उल्टा खेकावून उठला. मटीले दाट्याले लागला,

"काय पोरं हाये गडा .. निस्ताई नहीस तिच्या आंगी !"

"बस करा वऽ माय बाई ! लाम्हनस लावता कोन्ह्या गोठची.. हात जयाला लेकराचा. आत्मा तरमयून राहाला तिचा. आन् तुम्ही खेकावू राहाले."

तोंडावऱ्हची वाकरा काढत शांताबाई बोल्ली. बोल्ली काय दटावलं तिन्हं नवऱ्याले. मटीच्या डोयात टचकनं पानी आलं. फुसफुस करत लागली रांध्याले तशीस. शांताबाई मान उचकावून पाह्याले लागली बोल्ली,

" कशी का व्हयेना -पुरं करून राहाती तुम्हच्हं ! कौतिक नही तुम्हाले पोरचं.

सऱ्या मुलखाची घाई तुम्हीस करू राहाले. वऱ्हून रूबाब खेंचू राहाले..."

आता तरी गरा गप बशीन, आसं वाटलं व्हतं; पण कशाचं काही !

उलट चेव सुटला त्येल्हे. ङ्डा उठला आगित तेल वतल्यावानी. बायकोच्या बोल्याचं निमित झालं त्येल्हे. टाकला भाजीत हात धून. म्हणतो कसा,

"आनखी मल्हेस बोलू राहाली का? फुटकी झाली का तू? का बयऱ्ही झाली? दिसू नि राहालं का तुल्हे - मजूर निंघाले त्ये..."

आंगावर येतो का काय म्हणून शांती वरमली. नमती घेत खाली सरकली. मटी घाबऱ्याने लागली. गरा रागारागात भाईर चाल्ला गेल्हा.

गाडी चौकात उभी होती. तठी यक मजुर नही. गरा यून उभा राहाला. नाकावऱ्हच्हा घाम कायम. आनखी जीवार आली...दिन्यावर. हावन्नं सालपनी ! आपल्याले मार घाई केल्ही. आन आठी तं कोन्हीव नही. घाईपायी पोरचं बोट जयालं. बायकोचा वटका बसला - उपाशी येनं पडलं.. कुरकडत उभा राहाला...

थोड्या टायमानं यकेक टपकले. मजूर जमा झाले. वांधरावानी टरकात बसले. इंजिन घुरघुर कऱ्याले लागलं. धुक्कय सोड्याले लागलं. समद्यावर नजर टाकून दिन्या पुढे जावून बसला. टरक धकला. तसा मांघुन आवाज आला,

"बाबा ऽ वऽऽ वऽ बाबाऽऽ"

"आरेऽआरेऽऽऽ थांबा थांबा.. गाडी थामवा..."

3वो ऽदिन्याभू ऽऽ"

गल्का झाला. मजूर उठून उभे राहाले. कायपता कऱ्याले लागते. बोल्ले,

"आरे ऽ वो ऽऽ गराभू .. तुम्ही लेक पयत यून राहाली..."

गरा ताडकन उठला. ढुकुन पाह्याले लागला. खरस मटी पयत व्हती. हातवारे करून खुनावत व्हती. आराया मारून थांब्याच सांग व्हती. गरा घाबरून गेल्हा. काय झालं, गडा? पोर काहून पयत यून राहाली? शांतीचं तं बरं वाईट झालं नशिन? दोर पक्का धरून घेतला. गाडी शामूद्याचा धीर नही. वऱ्हून कुद्याले पाहात व्हता. गाडीतल्या मजुरांन्ह धरून ठिवेल व्हता म्हनून बरं व्हतं.

गाडी थामतास मटी युन उभी राहाली. बोलायेबी ना तिच्याकडून ! फुसफुस करत व्हती. खालून वऱ्हे चढ्याले पाहात व्हती. गरा खाली कुद्याले पाहात व्हता. त्येवढ्यात दिन्याभू उतरून आला . बोल्ला,

"काय झालं मटाबाई?"

तं तिन्हं त्येच्या हाता गठोडं देल्ह. घाबर घुबर बोल्ली,

"जेवलाबी नि मह्या बाप! त्येची भाकर आनली "

"हत्तं त्येच्या बही ! म्हनलं का काही गरबड झाली?"

"नही हेस व्हतं."

"यवढ्यानं काहून कल्लावून राहालती मंग?"

"गाडी थांम्यासाठी!"

सम्दयानं सुस्कारा टाकला. गराचं तोंड पाह्यासारकं झालं व्हतं. मटीच्या थोबाडीत ठिवतो का काय वाटलं व्हतं; पन तसं काही झालं नाही. त्येच्या कापऱ्या डोयात पाणी यून गेल्हं. चटकन पोरले जोय वढलं. चटका लागेल हात पाह्याले लागला. बोल्ला,

"कशाले येत बसली बेटा यवढी पयधाव करत?"

"कशाले म्हणजे ? उपाशी व्हता तू !"

"किती जीव हाये मह्या लेकचा मध्यामधी"

आन तो रड्याले लागला. मटीबी बिलगली बापाले. सम्देश पाहात राहाले. डायव्हर कल्ला कऱ्याले लागला. दिन्यानं आवाज देल्हा. भराभर वर चढले मजुर. धुराडा उडावत गाडी निंधून गेल्ही. जयता हात वऱ्हे करून मटी पाहात राहाली.

टराक नवरी सारकी सजली व्हती. हिरवी कचं. तसा तिचा रंग लाल व्हता. ठिकठिकाणी पानं लावल्यानं त्ये हिरवी झाली व्हती. तिच्या आंगावर पानं आशे खोशेल व्हते, की जनू चोळी, लुगडं नेसावलं. नक्षी आन् काठबी यका मेरीन माईरून देठं मधुन पानं सऱ्या आगंभर हिरवा साज.. कपाय पाठीवर फऱ्यांच्ह बाशिंग...

कोन्हाले सांग्याचस काम नही, टरक कुठी चाल्ली म्हणून...

गाडी सजेल धजेल आन मजूर? नुस्ते कैकाटेल. बुरशी लागेलवानी. यकाच्याबी चेहऱ्यावर तेज नही. कपड्यांल्हे पाहाली चव नही. फाटेल तुटेल कोपऱ्या परत्येकाच्या आंगात. कोन्हीस साजरा नही. डागी लागेल काही झाकी लागेल. आंगावर डाग तशे कपडयांवर डाग. हाडाचे सापडे वायेल पत्तीवानी. कसायानं ढोरं चालवले तशे बसले व्हते गाडीभर टकुरे.

सुट्टे... सुट्टे .. जो तो आपल्या इच्यारात.

गरा खाली बसून राहाला. गठोड्याकडे पाहात राहाला. किती कायजीनं भाकर घ्युन आली पोर आपली. किती जीव हाये तिचा आपल्यात. लय तरास हे तिच्या जीवाले. खेळा बागडाचं , साळा शिक्याचं वय हाये तिचं. ह्या वयात मगरी लागली बिच्चारीच्या मांघी. आभ्यासातून उठली तुल्ह्याजो बसली. घोर सुरू झाला तिच्यामांघी. भाकरी करतांना हात जयून गेल्हा. आता कसं काय लिव्हीन बरं त्ये? केवढाले फोडं आले बोटाल्हे. खरस लिव्हानार नही का तिच्याकून? का करपून जाईन तिचं आयुकश?

लय उरक हे मटीले कामाचा! जेच्या घरात जाईन

त्येच्या संसाराचं सोनं करीन. आपला संसार तिन्हस उजडून टाकला, आता तं भार उचलून-राहाली त्ये, म्हणूनबी बरं हाये. ठाकुरकी हाये आपली. टायमोटाईम खायाले भेटतं तरी. नही तं कधीचेस डफडे वाजले आसते आपले. शांतीची राख हून गेल्ही आसती. कसं गुनाचं लेकरून हाये. आन तिच्यास भवती भवाहश आला. तिच्यास काय सम्दया घरालेस मगरी लागली आपल्या. शांती किती वाया गेल्ही. पाव्हात नि तोंडाकडे तिच्या. हाडकं दिसू राहाले. सापडा पडेल राहातो खाटीवर. लय खस्ता खाल्या तिन्हबी. आपल्या पेकशा जास्त राबली त्ये. पयल्हया पासून ध्यास कामात हाये. घोडे वाहू वाहू लंबी झाली सरी. जवानीत कशी केळीच्या खोडावानी व्हती भरीव. आता चिम्हावून गेल्ही जुनारीच्या खोडावानी! केळीच्या पाडा तिची आशी हालत व्हयाले कारणीभूत हाये. संतती पायीबी खराबा झाला तिचा. तिच्या वटीले कोन्हाची नजर लागेल व्हती कान्नू? लेकरस वाचले ति तिचे. एक, दोन करता करता चागंले साताठमेल्हे. लेकरं जनू जनू कंबर कामातून गेल्ही तिची रया गेल्ही सरी. नांद सोडता सोडता मटी झाली. सरती. मरूझरू व्हती म्हणून मटी नाव ठिवलं. त्ये वाचली. वाढता वाढता वाढली. त्ये जसजशी वाढत गेल्ही तशी शांती खंगत गेल्ही. मटीनं वरपून घेतला तिच्यातलं आर्क. पिल वाढत गेल्हा की खोड खंगत जातं तसा. शांतीनं खाट धरली. हातापायातलं बळ झरल्यावानी. कोम्हावून गेल्ही. तिचा जीव मटीमधी उतरला व्हता. कधी कपायाले तांधुय लागतां आन कधी आपली सुटका व्हते, आसं त्ये पाहात व्हती. त्येवढ्यासाठीस जगत व्हती. आन मी कसा उभा हाये महे मल्हे मायथी ! कशाचा काही थारा नही. शरीर साथ देतं म्हणून बरं हे. एक दिवस काम बंद नही. बागातून घोडे वाह्याचं काम सोपं नही. ताकद लागते. कंबर तोलत चालतं पडतं. उरावर घोडे हयून पयनं पडतं. कधलोंग तग धरवार हे मी बी? हात पाय थकल्यावर कसं व्हईन आपलं? मटीच लगन... शांतीचा आजार आपला संसार...

टराक पुढे चालत व्हती. गरा मांघी फिरत व्हता. मनाच्या डव्हात शिरत व्हता. मटी, शंती आनू सोताभोवती फिरत व्हता. कशाच काही भान नही. डांबरी सरून कच्चा रस्ता लागला. दनके लाग्याले लागले. टकुरे चुळबुळ कऱ्याले लागले. यकानं याद देल्ही,

"भाकर खावून घे गरा भू. पुढे रिकांपन व्हनार निमंग !"

"अंऽ हांऽ!"

त्येन्ह भाकर सोडली. गराची भाकर खानि व्हतं नही तधलोंग गाडी थामली. टका बागाचो.. कापनारांन्ह आधीस बव्हाडा फिरावेल व्हता. कोयत्यांल्हे फडके गुंढायेत त्ये भाईर आले. टरकीतले मजुर खाली उतरले. बागात घुसले. यका मेरीनं भिडले.. यरावर यर दोनदोन घोडे.. कोन्ही खांद्यावर कोन्ही डोख्यावर... काही हातात घ्यून पयत व्हते.. बागाच्या भाईर काढा सुरू व्हता. बागातले घोडे आणून तठी ठिवल्या जात व्हते. सवराच्या सवरा काटा व्हता व्हता. माल टरकात भरात व्हता. राशी लागत व्हत्या. उडतनी रचात व्हत्या. राका बागातला पाडा सरतास दुसऱ्याचा रस्ता दिसत व्हता. भराभर मजुर पयत व्हते. गाडी भराल्याशिवाय आपली सुटका नही. हे त्येल्हे मायशी व्हतं

झापडं पडल्याने गाडी गावात परतली. मटीनं सयपाक करून ठिवेल व्हता. माराचं डोखं दाबत व्हती. बापाची वाट पहात व्हती. तो घरी आल्यावर तिन्हं ताटं वाढले. जेव्याले बसले. भांडेकुंडे आवरून आभ्यास करत बसली. दोन्ही नवराबायको बोलत बसले. त्येच्याजो दिन्याभू यून बसला. आश यून बशे तो. मजुरांशी आपुलकीनं वागे. सुपरवाझरकी दाखोली नि कधी त्येन्ह! कायम मुजरांच्या भल्याचा इच्चार. चूकून भेदभास केल्हा नही. आधी मजुर मंग संस्था- आसं त्येचं धोरण व्हतं. गराच्या घराकडेबी त्येचं येनं जानं व्हतं. कायम चक्कर राहे त्येचा. नडल्या आडल्याने काम भागवे.

खर्चापाण्याले पैसा द्यून टाके. शांताबाईसाठी गोयाआवशदी आनून दे. मटीच्या आभ्यासाची चवकशी करे. त्या घरातलास व्हाताजनू तो! कधी परपोसापना केल्हा नही. का कराया नही. शांताबाई आजारी पडल्यापासून त्येची बैठक जास्तस वाढली व्हती. आताबी येताखेपी तिच्या खाटीजो बसला तो. चवकशी करत इच्यारलं,

"काय म्हनते तब्येत?"

"हाये तशी हाये भो !"

"पानी दे मटी भाऊले . . ."गरा

मटी पुस्तक वाचत व्हती. दुसरा कोन्ही आसतातं उठनं जिवार आलं आसतं तिचं. पन दिन्याभू. व्हता म्हनून चटकन उठली. पानी देल्ह तिन्ह त्येल्हे. पानीगिनी पेल्हा आन दिन्याभू खुशाल शांताबाई , गरावर खेकाला,

"काय मटी ,मटी करता भो तुम्ही बी. साजरय नाव हाये तिचं मटाबाई!"

"लाहानपना पासून तोंडात बशेल हाये. म्हनून म्हनतो भो--"

"आता का लाप्तन राहाली का मंग मटबाई? दोन दिसानं लगन व्हईन तिचं"

दिन्याच्या आशा बोल्यानं मटी डिवचल्यावानी झाली. खिजाल्यावानी बोल्ली,

"जायरे भो तू ! काहीबी म्हनत् का?"

"काहीबी कशाले म्हणू बरबर म्हनतो हे बी . आभ्यास कर तू गुपचूप."

मटीनं पुस्तकात तोंड खुपसलं. पुढे शांताबाईनं इपरा वाढवला.

"खरंस लगनासारकी झाली पोरं. आनं हे खुशाल डोये लावून बसू राहाले. कुठी काही पाहाताबर नही."

"पाहातो नही तं काय ! तुल्हेस कायजी हे काय तिच्या लगनाची. "

"व्हईन्न वऽ काकू , मटाबाईच लगन. तुम्ही कशाले चिंता करता. कोन्हा करे तिल्हे. रूपवान हाये ते. यखांद्या शिरमंताच्या घरात आसती तं. चिज झालं आसतं तिचं खरंस. ! पन आझूनबी काय झालं म्हना?"

"यवढाल्या पोन्ही हू नि देता भो आम्हच्ह्यात. लोक नावं ठिवता. जमाना चांगला नही रावत. शिवायी मध्या जीव पाहाला आसा. डोयादेखत व्हयेल बरं राहिन म्हनलं."

"मल्हे का त्ये समजत नही का? पन मंग पैसा बी तं पायझे आपल्याजो ! लगन करनं काही थट्टाबाजीचा खे नही. कार्यासाठी-हुड्यांसाठी कुठुन आनती पैशा? राखल्याच्या मजूरीवर- पोरचं शिकशन, तुध्या आजार का संसार व्हईन? गराच्या बोल्याले धार चढली व्हती. चटकन उठून बापले पाणी द्या, आसं मटीले वाटलं; पण त्ये उठली नही. खालची मान वऱ्हे केल्ही नही. कारन पुस्तकावर शेम टपकत व्हते. गराच्या सावलानं शांताबाईनी गप झाली व्हती. तनावासारकं झालं. वातावरण निवळ्यासाठी दिन्या पुढे बोल्ला,

"काय परसंग आला सालापनी ! तुम्हच्यामधी पोन्हीचे लगनं निहू राहाले पोन्हं पाहाने पडू राहाले. हुंडा द्याले-लगन कऱ्याले पैसा नही म्हणून तुम्ही जीव काढू राहाले आन आम्हच्यात ? नेमकं उलटं हाये. पोन्ही भेटू नि राहाल्या."

"आसं काहून दिन्या भू ?"

न राहून मटीनं इच्यारलस तरी. तो पुढे सांग्याले लागला,

"लय म्होटी भानगड हाये मटाबाई त्ये ! पुढारेल समजतो आम्हचा समाज सोताले. शिकशनाचा परसार आती झाल्याचा परकार हाये हा. झालं पैसा मामुर हून गेल्हा. हुंड्याची पद्धत आम्हच्यात बी व्हती. मुडली कशी त्ये सांगतो, तुम्हच्यात तरी हाजारानं हुंडा देना पडतो. पैसा मोजून देल्हा, की नवरी उसलून नेता. नवरदेवाच्या दारी वटनं हात धुनारे लोकं तुम्ही. आम्हच्यात तसं नही. लगन नवरीच्या दारीस लागलं पायझे. आशी पद्धत. वऱ्हून नवरेवाले लाखाच्या वऱ्हून हुंडा द्या. नुस्ता पैसा नही,

सोनं नानंबी देनं पडत व्हतं. वरमाय-वरबाप, वऱ्हाडाची तोलतोल न्यारी. मानपान , भांडेकुंडे, आहेर, पंगत आसा सम्दा खर्च. बारा.भानगडीपान्ही नवरीचे बापं किंदरले. कंबरडे मुड्यावर आले. शिरमंतांच्या नाकी नऊ याले लागले. गरीबांच्या पोऱ्हींवर जीव द्याची पायी आली. मायबाप निजून राह्याले लागले. आशा लयास घटना घडल्या. ह्या चक्रातून भाईर निंघ्याचा लोकं इच्यार कऱ्याले लागले. पोटी पोर नकोस आसं वाट्याले लागलं. खर्च, मानपान आन कायमची ललोपती नको म्हणून त्येंन्ह तोडगा काढला."

"कसा काय?"

"विज्ञान धावून आलं त्येच्या मदतीले. आसा शोध लागला की बाईच्या पोटात पोर हाये का पोरगा , हे समज्याले लागलं."

यवढसं नही तें नको आशिन्त पाडताबी याले लागलं.

"आत्ता वऽऽ मायबाई!"

"जळस खनून काढली म्हनलं लोकान्ह ! पोरचा गरभं आसला , की पाडा ! आश लयस पोऱ्हींच्हे जीवं घेतले. जगं सुद्धा पाहू देल्ह नही. मान आपमान- लाखो रूपये खर्च करून जलम भराची खरूज लावून ह्या पेकशा चारपाच हाजारात काटुक मीट्याले लागलं. पैसा वाचला पाराझे आन रूढींच्या कचाट्याचून सुट्यासाठी पोऱ्ही माऱ्याचा सपाटा सुरू झाला. त्येच्यानं काय झालं? पोऱ्हीच्ह परमान निरनाम कमी झालं. पोऱ्हं वाढले. पाहाता पाहाता परस्थिती पालटली. पोऱ्हीवाल्यांचा तान कमी झाला अन् पोऱ्हांवाल्यांचा वाढला. पोऱ्हांसाठी पोऱ्ही भेटन्या मुश्किल झाल्या. "

"खरं हाये बेटा , दिन्याभू सांगतो त्ये ! "गरा

"चांगल्या चांगल्याने पोऱ्ही भेटता नही गरादादा आम्हच्ह्यात. मघ्यावूनस पाहा नं तुम्ही चेटलं तं इझनार नही, यवढी इस्टेट नही, यवढी इस्टेष हाये मह्या घरी. तरी मल्हे पोर भेटत नही."

"काम्हू ? मटी"

"नवकरीवाला पायझे त्येलहे !"

"तुल्हे तं नवकरी हाये नं ?"

"आशा नवकरीले नि हेपलता कोन्ही. सरकारी पाहाता त्ये- सरकारी नवकऱ्या हायती कुठी? सहकारी सुद्धा भेटता नही. उगस मघ्या बाप डायरेक्टर हाये म्हनून हेबी भेटली. जातीवाली नही तं नही. मी तं परक्या जातीची कऱ्याले तयार हाये आता."

"आह्या बापा । आसा काय बोलल राहाला तू ?"

"खोटं काय हाये तिच्यात काकू? लयस लोकान्ह कऱ्न्या लावल्या गावोगावी गंजस लगनं लागू राहाल आशे. आपल्या गावात नि आल्या? शामराव पाटलाची लाहावी बाहरी न्याऱ्या जातीची हाये. महाजनबॉन तं आसरामातली करून आनली."

"आबकून हाये मी बी, गरान रापोट देल्हा"

"हाव्व माय ! मठीनं पुस्तक ठिवलं."

रात बरीस झाली व्हती. डोयांव्हर झापड चढली. दिन्याभू जरा जास्त बोल्ला व्हता आज. आशूनबी बसला आसता तो. पण गराभू जांभोऱ्या द्याले लागला.

त्या राती मटीले झोप लागली नही. इच्यार करत राहाली. पहाटेबी कामात चिथ लागतं नही. आभ्यासातून मनं उठलं. सयपाक मातर टायमावर केल्हा. दिन्याभू गराले बोल्हाव्याले आला ताव्हा त्ये मांघी लागली. पाडा वाह्याले याचं म्हनत व्ह्ती गरा , दिन्या नही म्हनत व्हते. शाळेत जायाचं सांगत व्हते. शांताबाईनबी नकार देल्हा; पन मटीनं आयकलं नही. कामाले जायाचं ठरावूनस टाकला व्हतं तिन्ह. शाळेतली पोर केळरी कामगार झाली. पाडा वाह्याले लागली. त्येवढाव हातभार लागला. दोन्हींची मूजरी याले लागली. दोन पअशे शिल्लक पड्याले लागले. शंताबाई , गरा मटीच्या लगनाचे सपनं पाह्याले लागले. दिन्याभू सुपरवायझर आल्यानं बरं व्हतं... त्येन्ह मटीले वागवून घेतलं... तिच्याकडे हाल्क काम देल्हं..

मराले काट्यावर ठिवला. पत्ती वाहता वाहता मटी आवूड घ्याले लागली. दोन दोन घोडे वाह्याले लागली. उसलून द्याले दिन्याभू व्हतास.. .. तो तिल्हे मदत करे.

सम्द पद्धतशीर चालू व्हतं. दिसामाघून दिवस जात व्हते. दोन पैशे शिल्लक पडत व्हते. आसं आसतांना शांताबाईले घोर वाट्याले लागला. कायजीचा कीडा घर कऱ्याले लागला. तिच्या कायजीचं कारनबी तसस व्हतं- मटीची पाळी चुकली व्हती.

शांताबाईची झोप उडाली. तिन्हं नवऱ्याचं कानावर टाकलं. तो भडकून उठला. मटीले जाब इच्च्याऱ्याले लागला. तं तिन्हं दिन्याचं नाव सांगलं. आयकून थंडेगार झाले. कुपाटीनं वावर खाल्ल व्हतं. खिजावून त्येन्ह दिन्याले जाब इच्च्यारला,

"कारे! भो, शोभलं का तुल्हे?"

भाईर आगाचा हू नही म्हनून दिन्याले घरी बोल्हावून घेतलं व्हतं. राती मटी कोपऱ्यात रडत व्हती. शांताबाई दातमीठ्या खात व्हती तिची, गरा पेटून उठला व्हता. खाऊ का ठयू करत व्हता. इज्ततचा पंचनामा हू नि म्हनून तो गप व्हता तिची. गरा पेटून उठला व्हता. खाऊ का ठयू करत व्हता. इज्जतचा पंचनामा हू नि म्हनून तो गप व्हता. नही ते यका टपून्यात दिन्याले मारून टाकला आसता त्येह. दिन्या शांत व्हता. चोरावानी. गरान्ही आत्तर पित्तर काढली तरी तो उलटून बोल्ला नही. राग कमी झाल्यावर त्येन्ह गराच्या पायावर डोखं ठिवलं शिस्ताईन निस्ताईन बोल्ला,

"चूक झाली दादा बही..."

"चूक झाली म्हनतू का आझून? शेन खातू का तू? चांगला शिकेल हाये नं ! आम्हलो ग्यान शिकाडत व्हता. मंग हे माटी खाऱ्याचे धंदे खो सुचले तुल्हे ?"

"चूक झाली मह्या कडून..."

तरीबी तसास .. चूक तुन्ह केल्ही आन भवाडा आम्हच्हया भवती. तोंड दाखव्याले जागा नही आम्हाले भाईर कसं करा आम्हीनं कोन करीन तिच्याशी लगन?

हयास परसंगाची वाट पहात व्हता जनू तो. गराच्या तोंडून केविलवाने शब्द निघतात दिन्या सोकावला. खोल मनातला भाव चेहऱ्यावर आला. डोयात न्यारीस चमक दाटून आली.आंधारात काहीतरी सापडल्यासारखी दचकून बोल्ला,

" तिची नका चिंता करू तुम्ही ! मी करतो तिच्याशी लगन..."

"तुही यवढी हिम्मत हारामखोरा!"

आसं म्हनूनू दिन्याच्या नल्डीचा घोट घेता का म्हनलं; पन तसं काही झालं नही. शांताबाईन चपडाई केल्ही. नवऱ्याने दाबलं. तरीबी तो बोल्लास,

"समाजाची पोर भेटत नि म्हणून आम्हच्हया पोरवर फासा टाकला वाटतं तुन्हं?"

"तुम्ही काही समजा ; पन म्हले माफ करा. पुढचा इच्चार करा... मध्याशी मटीचं लगन लावून द्या."

"हटटऽ भडव्याऽऽ!"

"मी वाईट दिसता कां तुम्हाले? पोर गरीबाच्या घरात पडून राहाली तुम्हच्ही?"

यन्हहबी तुम्ही कायजीत व्हतेस! दूर केल्ही मीन्ह. आता तुम्हाले खर्च कऱ्याचं काम नही. उलट मी पैशे देतो. तुम्हाले. किती दयू सांगा? राहाला मध्या मायबापाचह त्येच्ही बी तयारी हाये. बोल्लो मी.

"महे डोखस नि चालू राहालं! रात गच्ची झाली. आता तू इठूनं चाल्ला जाय, "गरा

"हांऽ ! जातो मी... वाटल्यास पाहाटे सांगा मल्हे..."

दिन्या गेल्हयावर दोन्ही नवराबायको बसून राहाले. मटी रडतारडताच झोपी गेल्ही. शांताबाईनं इषय काढला. काय करता मंग?

"काय करती?"

"मध्या मते लावून द्या मटीचं लगन त्येच्याशी. नही तरी दुसरा कोनथा मार्ग हाये मंग?जे झालं त्ये झालं. हून गेल्ही तूकी दोन्हींकडून. नाकबूल थोडी झाला तो.

चूक कबूल करू राहाला. माफी मांघू राहला. चांगला हे तसा तो, शिरमंत हाये. आपल्यापेक्षा भारी जातीचा हाये. शिवाय पोरचबी मन दिसतं..."

गरा काही बोल्ला नही. चेहऱ्यावर हावभाव दाखोले नही. राहाला बसून तसास आंधाराकडे पाहात राहाला. शांताबाई त्येच्या बोल्याची वाट पहात राहाली. पोर झोपली व्हती. घोऱ्याले लागली व्हती. रात उलटल्यावर गरान हुंडू फोडला. बोल्ला,

"शांत्ये..!"

"काय?"

'आपन गरीब मानसं. केळी कामगार. हालक्या जातीचे आसू भलाई; पन हालकट धंष कधी केल्हे नही. जेवले तठी हागलो नही. इमान कधी सोडला नही."

"खरं हे !"

" कधी कोन्हाच्या वाटी गेल्हो का आपन? नही ! मंग हे लोकं काहून आपल्या वाटी जाता ? पायदळी घ्याले पाहाता आपल्याते. जशी काही आपल्या लेकीबाईले इज्जतस नही. पैशाच्या जोरावी काहीबी कऱ्याले पाहाता. आझून दाबून माऱ्याले पाहाता. इकत घ्याले पाहू राहाला तो आपल्याले. कुठुन आनला त्येन्ह यवढा पैसा? केळीच्या भरोशावर? केळी कोन्हाच्या भरोशावर पिकवतो तो? आपल्या! आपल्या घामाच्या भरोशावर पैसा कमावता हे लोकं. आन् त्या पैशावर आपल्याले दाबून माऱ्याले पाहाता."

गरा बोलत व्हता... जसाकाही रडत व्हता.. धरल्यावानी करत व्हता..

सबदापरत आंगार वकत व्हता... चिनग्या उडत व्हत्या... आंधार पेटावून टाकतो का काय- का सोतास चेटुन जातो? डोख्याच्या चिंधड्ये उड्याले पाहात व्हत्या त्येच्या. तोंडातून भपके सोडल्यावानी बोलत व्हता,

"केळीच्या लागवड कशी करता शांते?"

"रांगीझीर करता यकामेरीनं- दोरी लावून... आंतरा आंतरानं..."

"यखादी बेनं आडमूल्हानी उगलं तं?"

"उपटुन फेकनं पडतं त्येल्हे ! नहीं तं कापून टाकनं पडतं... पिलपत्तीवानी!

पन आसू काहून इच्यारून राहाले तुम्ही?"

"कायन्ही , आसस... झोप आता, पायटी पाहू..."

दिन्यापे रातभर झोप लागली नही. दिवस निंघ्याची वाट पाहात व्हता. काव्हा रात सरते आन काव्हा नही, आसं झालं व्हतं त्येल्हे. रातच्या राती मायबापाले सांगून बंदोबस्त करून ठिवला गड्यानं. पायठीस भाइपुऱ्याकढे गेल्हा. मटीच्या दारापुढे गर्दी दिसाली. दूऱ्हूनरा पाहून बिचकला... थबकला. घाबर घुबर चवकशर केल्ही. आन् गरकन माघी फिरला.

■ ■ ■

**( पृष्ठ १६ वरून पुढे )**

पुस्तकातील बहुतेक सर्व कथांमधून एकच सूत्र बघायला मिळते, ते म्हणजे कोणत्या तरी बाह्य घटकाच्या मदतीने स्फूर्ती घेऊन आदिवासींनी घडवून आणलेला आपल्या गावचा कायापालट. वास्तवात अशी किती उदाहरणे घडत असतील, याबद्दल शंकाच आहे. तरी देखील या पुस्तकाकडे एक साहित्यकृती म्हणूनच पाहिले पाहिजे. आदिवासींविषयक कथा लिहून लेखिकेने या साहित्य प्रकारात मोलाची भरच घातलेली आहे.
वीणा आठवले यांचा हा प्रयत्न अतिशय स्त्युत्य असाच म्हणावा लागेल.

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | गोंदणपाडा |
| लेखक | : | वीणा आठवले |
| प्रकाशक | : | अक्षरमुद्रा प्रकाशन, नाशिक १ |
| प्रकाशन वर्ष | : | २००१ |
| पृष्ठ संख्या | : | ८७ |
| किंमत | : | ६०/- रूपये |

पुस्तक परिचय

# आदिवासींचे कैवारी - खंडेराव सावे

ग. शां. पंडित

लेखिका : मीना पाटील

ठाणे व रायगड जिल्हयांतील आदिवासींच्या शोषण मुक्तीचे व कल्याणाचे कार्य सुमारे २५ वर्षे करणारे व 'वारली' जमातीवरील अभ्यासपूर्ण असा पहिला ग्रंथ लिहिणारे श्री खंडेराव सावे यांचा व त्यांच्या कार्याचा परिचय करून देणारा 'आदिवासींचे कैवारी- खंडेराव सावे' हा चरित्रग्रंथ श्री. सावे यांच्या कन्या श्रीमती मीना पाटील यांनी लिहिला आहे.

या छोटेखानी ग्रंथातील एकूण १२ प्रकरणांमधून मीनाताईंनी श्री. सावे यांचे चरित्र व कार्य थोडक्यात, परंतु प्रभावी शैलीत मांडले आहे. प्रस्तावनेत एकंदरीत चरित्राची मुद्देसूद मांडली आलेली आहे. त्यामुळे पुस्तकातील प्रकरणांमध्ये कोणत्या विषयांचा ऊहापोह केलेला आहे, याची कल्पना येते.

श्री. खंडेराव जगन्नाथ सावे यांचा जन्म ठाणे जिल्हयातील बोर्डी येथे एका शेतकरी कुटुंबातला. घरातील शिस्त व श्रमनिष्ठेचे संस्कार त्यांच्यावर लहानपणीच झाले. थोर शिक्षणतज्ज्ञ व समाजसेवक आचार्य भिसे यांचे मार्गदर्शन खंडेरावांना लाभले. श्री. सावे यांचा काळ पारतंत्र्याचा होता. साहजिकच गांधीजींच्या प्रभावामुळे राष्ट्रभक्तीचे संस्कार त्यांचेवर झाले. अशा या वातावरणातच त्यांनी आपले शिक्षण कसे पूर्ण केले याची माहिती पहिल्या प्रकरणातून मिळते.

श्री. सावे यांनी १९३५ साली ठाणे जिल्ह्यातील 'वारली' जमातीचा अभ्यास करून त्यासंबंधीचा प्रबंध मुंबई विद्यापीठास सादर केला. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समाजशास्त्रज्ञ प्रा. एस. जी. घुर्ये यांनी या अभ्यासात श्री. सावे यांना मार्गदर्शन केले. विद्यापीठाने या अभ्यासाबद्दल सावेंना एम.ए. पदवी बहाल केली. पुढे या प्रबंधाचे 'द वारलीज्' या नावाने १९४५ साली पुस्तक प्रसिद्ध झाले. श्री. सावे यांना 'वारली' बोली अवगत होती. त्यामुळे वारली जमातीच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक परिस्थितीचे विश्लेषण यातून वाचायला मिळते. इंग्रजीतला हा चांगला संदर्भग्रंथ गणला जातो.

श्रीमती मीना पाटील यांनी या इंग्रजी ग्रंथाचे मराठीत भाषांतर केले आहे. या ग्रंथाविषयीची सविस्तर माहिती दुसऱ्या प्रकरणात दिली आहे. याला जोडूनच श्री. सावे यांच्या ग्रंथातील दोन प्रकरणे मराठीत दिली आहेत. ती आदिवासींच्या आर्थिक स्थितीवर प्रकाश टाकणारी आहेत. तसेच परिशिष्टात 'द वारलीज्' ग्रंथावरील मान्यवरांचे-ज्यात बाळ गंगाधर टिळक, ठक्करबाप्पा व इंग्रज अधिकारी यांचे अभिप्राय दिले आहेत. त्यावरून या ग्रंथाचे मोल लक्षात येते.

श्री. खंडेराव सावे यांनी १९३२ ते १९५४ या २२ वर्षांच्या काळात ठाणे जिल्हयातील

आदिवासींच्या शोषणमुक्तीचे फार बहुमोल असे कार्य केले. याची माहिती तिसऱ्या प्रकरणात वाचावयास मिळते. १९३२ साली 'सहायक मागासवर्गीय अधिकारी' या नियुक्तीने सुरूवात झाली. पुढे १९४२ साली ते 'विशेष आदिवासी अधिकारी' झाले.

तो पारतंत्र्याचा काळ असल्याने ठाणे जिल्हयांतील जमीनदार, सावकार, जंगल ठेकेदार आदिवासींचे फार शोषण करीत असत. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन तेथील जमीनदारांनी त्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या व आदिवासींना कूळ बनविले होते. आदिवासींकडून हे जमीनदार सक्तीने खंड धान्यरूपाने वसूल करीत. त्यामुळे आदिवासींना धान्य शिल्लक न राहिल्याने त्यांना वर्षातून काही महिने केवळ उपासमार काढावी लागे. सावकार भरमसाट व्याजाने कर्जे देत. ती कर्जे फेडण्यासाठी सावकाराकडे आदिवासींना वेठबिगार करावी लागे. जंगल ठेके दार आदिवासींना कमी मजुरी देऊन राबवून घेत.

जमीनदार व सावकार आदिवासींना शासनाने ठरवून दिलेली मजुरी देत नसत, हे जेव्हा श्री. सावे यांच्या लक्षात आल, तेव्हा ते आदिवासींना म्हणाले -' तुम्हास कामावर न जाण्याचा हक्क आहे- संप' हे एकून सुमारे एक हजार आदिवासी संघटीत झाले व त्यांनी १९४४ साली पहिला संप केला. वारल्यांचा संप लहान होता पण वारली रागवायला शिकू लागला याची ती खूण होती.

अन्याय दूर करावयाचा असेल तर केवळ अर्ज विनंत्या करून साध्य होत नाही. त्यासाठी लढा करावा लागतो, हा विचार आदिवासींमध्ये सर्वप्रथम श्री. खंडेराव सावे यांनी रूजविला. ही कामगिरी ऐतिहासिकच म्हणावी लागेल. श्री. सावे हे स्वत: जंगल कुपांना भेट देऊन ठेकेदार योग्य मजुरी देतात की नाही याची तपासणी करत. जे ठेकेदार आदिवासींवर जुलूम करीत त्यांच्यावर सावे कायदेशीर कारवाई करीत. त्यामुळे जंगल ठेकेदारांकडून आदिवासींचे होणारे शोषण दूर झाले.

डोंगर कपारीत राहणाऱ्या आदिवासींवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी श्री. सावे त्यांच्या सोबत राहिले. डाक बंगल्यात राहणे सोडून दिले. 'कसेल त्याची जमीन' हा कायदा पास झाल्यावर श्री. सावे यांनी आदिवासींना जमिनींचे मालक बनवले, लग्नगड्यांना मुक्त करून वेठबिगार पद्धत बंद केली.

डहाणू येथे उपजिल्हाधिकारी व आदिवासी कल्याण अधिकारी या पदावर श्री. सावेंनी ८ वर्षे काम केले. या काळात त्यांनी आदिवासींसाठी काही कल्याणकारी कार्यक्रम राबवले, याची सविस्तर माहिती आपल्याला चवथ्या प्रकरणात वाचायला मिळते. ठाणे जिल्हयात आदिवासी युवकांची अनेक संस्कार शिबिरे घेऊन त्यांचे प्रबोधन केले व त्याद्वारे त्यांच्यात विधायक नेतृत्व निर्माण केले. मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या विकासकार्यात त्यांनी अन्न उत्पादनाला पहिले प्राधान्य दिले. कारण येथे कुपोषणाची समस्या ही प्रमुख होती. श्री. सावेंच्या या कामाचे कौतुक भारत सरकारचे सल्लागार व आदिवासींचे एक ब्रिटिश अभ्यासक डॉ. व्हेरिअर एल्विन यांनी प्रत्यक्ष मोखाडा विकास गटाला भेट देऊन केले.

आदिवासी युवकांना शेतीच्या सुधारीत पद्धतीचे शिक्षण देण्यासाठी कोसबाड येथे कृषी विद्यालय स्थापन करण्यातही श्री. सावे यांचे योगदान मोठे आहे. तसेच प्रत्येक आदिवासी पाड्यावर पिण्याच्या पाण्याची विहीर असावी यासाठी पुढाकार घेऊन विहिरींची सुविधा करून दिली. एवढेच नाही, तर आदिवासी स्त्रिया व मुलांचे होणारे मृत्यू रोखण्यासाठी अथक प्रयत्नातून डहाणूला एक मिशन हॉस्पिटल सुरू केले. श्री. सावे यांच्या या कल्याणकारी कार्यातून त्यांच्या सेवाभावी वृत्तीचे दर्शन घडते.

मुंबई राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी सेवा मंडळ ही स्वयंसेवी संघटना स्थापन करण्यात आली. तिथे चिटणीस आचार्य भिसे गुरूजी होते. जंगल ठेकेदार, जमीनदार व सावकार यांच्याकडून आदिवासींवर होणारा अन्याय थांबविण्यासाठी श्री. सावे यांना या मंडळाचे मोठे सहकार्य लाभले होते. या मंडळाच्या कार्याची माहिती पाचव्या प्रकरणात मिळते.

श्री. खंडेराव सावे यांच्यावर आचार्य भिसे, ठक्करबाप्पा, अण्णासाहेब कर्वे, छोटूभाई देसाई यांच्या विचारांचा पगडा होता. आदिवासी सेवेचे कार्य हे स्वयंसेवी संस्थेद्वाराच केले पाहिजे, या मुद्यावर या सर्व विचारवंताचे एकमत होते. अशा या सहाव्या प्रकरणात ज्येष्ठ समाजधुरीणांच्या बहुमोल विचारांची ओळख होते.

सातव्या प्रकरणात श्री सावे हे द्रष्टे अधिकारी कसे होते, याची जवळून ओळख होते. तर या प्रकरणाला जोडूनच असलेल्या आठव्या प्रकरणात श्री. सावेंची शासकीय कारकीर्द किती वैविध्यपूर्ण व आव्हानात्मक होती याचा प्रत्यय येतो.

श्री. खंडेराव सावे यांचा जन्म सोमवंशी क्षत्रिय समाजातला. या समाजात निरक्षरतेचे प्रमाण अधिक. समाजाच्या सुधारणेसाठी सावेंनी 'सोमवंशी क्षत्रिय समाजोन्नती संघ' नावाची स्वयंसेवी संस्था स्थापन केली. या समाजाने कृषी क्षेत्रात नवनवीन प्रयोग केले. ज्येष्ठ कृषीतज्ज्ञ व भारतीय योजना आयोगाचे माजी सदस्य डॉ. जयंतराव पाटील हे श्री. सावेंचे जावई तथा लेखिका मीनाताईंचे पती होत. यावरून या समाजाने शेती क्षेत्रात किती कौशल्य प्राप्त केले आहे हे लक्षात येईल. नववे प्रकरण सावेंनी आपल्या सोमवंशी क्षत्रिय समाजासाठी केलेल्या कार्याचे आहे. दहाव्या प्रकरणात श्री. सावे, डॉ. दीनानाथ चुरी, व श्री. शामराव पाटील या तीन मित्रांच्या अतूट मैत्रीतून झालेल्या समाजसेवेची ओळख होते.

अठराव्या प्रकरणातून श्री. खंडेराव सावे यांच्या उद्योग, कृषी, शिक्षण व समाजसेवा क्षेत्रात असलेल्या कुटुंबियांची सविस्तर माहिती मिळतेच. परंतु ती अत्यंत प्रेरणादायी आहे.

श्री. सावेंना दादा नावाने संबोधत. आपल्या दादांविषयी कुटुंबातील व नात्यातील व्यक्तींनी सांगितलेल्या आठवणी श्री. सावेंच्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकतात. जोडीला काही छायाचित्रे सुद्धा दिलेली आहेत.

श्रीमती मीनाताईंनी आपले वडील

(पृष्ठ ३८ वर पहा)

पुस्तक परिचय

# कातकरी

ग. शां. पंडित

लेखक : विजय साठे, बन्सी घेवडे

महाराष्ट्रातील ४७ आदिवासी जमातींपैकी 'कातकरी' ही एक आदिम जमात. कातकऱ्यांचा विशिष्ट प्रदेश सांगता येणे तसे कठीण. कारण ही जमात विखुरलेली आहे. विशेषत: पश्चिम महाराष्ट्र व कोकणात गावोगाव कातकऱ्यांची तुरळक वस्ती दिसते. पोटापाण्यासाठी गावोगाव भटकणारे कातकरी इतर आदिम जमातींपेक्षा म्हणूनच वेगळे ठरतात. कारण इतर आदिवासी जमातींची गावे, पाडे, विभाग आहेत तसे कातकऱ्यांचे नाही. त्यांच्या उदरनिर्वाहासाठीच्या भटक्या वृत्तीमुळेच आजपर्यंत त्यांचे प्रश्न सुटलेले तर नाहीतच, उलट ते अधिक किचकट होऊन बसलेत.

यापूर्वी आचार्य शं. रा. भिसे यांनी 'जंगलातील प्छाया' या आपल्या निवेदनात्मक कादंबरीत कातकरी जीवनाचे हृदयद्रावक चित्रण केले होते. त्यात त्यांनी मुंबई, ठाणे जिल्ह्यातील कातकऱ्यांची परिस्थिती वर्णन केली होती. त्यानंतर आता 'कातकरी' या नावाने प्रकाशित झालेले हे पुस्तक म्हणजे डॉ. विजय साठे व श्री. बन्सी घेवडे यांनी केवळ रायगडच नव्हे, तर रत्नागिरी, नासिक, पुणे, ठाणे या जिल्हयात विखुरलेल्या कातकरी जीवनाचा मांडलेला अभ्यासपूर्ण आलेखच आहे.

'ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स' या स्वयंसेवी संस्थेने कातकरी जमातीविषयीच्या माहितीचे संग्रहण व त्यांच्या विकासाच्या दृष्टीने जे काम हाती घेतले त्या प्रयत्नातूनच हे पुस्तक प्रकाशित केले आहे. मात्र त्यासाठी डॉ. साठे व बन्सी घेवडे यांनी बरीच मेहनत घेतल्याचे या पुस्तकावरून दिसते.

पुस्तकाला यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू श्री. अशोक प्रधान यांची प्रस्तावना आहे. त्यांनी आपल्या प्रस्तावनेत पुस्तकाचाच परामर्श घेतला आहे.

पुस्तकात एकूण ८ प्रकरणे असून ११ प्रकारच्या पुरवण्यांमध्ये शासकीय आदेश, परिपत्रके, अर्ज नमुने, जाहीरनामे या गोष्टी या पुस्तकातील अभ्यासपूर्ण विवेचनाला आधारभूत ठरतात.

'कातकरी कोण?' या पहिल्या प्रकरणात 'कातकरी किंवा काथोडी' हे नाव कसे पडले याची माहिती देऊन लेखकांनी कातकरी पुरूष व स्त्रीच्या शरीरयष्टीचे, वस्त्रांचे वर्णन केले आहे. त्याचबरोबर त्यांची आहार, उदरनिर्वाहाची कामे, घरांची अवस्था, लग्न पद्धती, अंधविश्वास, साक्षरतेचे कमी प्रमाण, दारूचे व्यसन, इतर विधी इत्यादी गोष्टींचा ऊहापोह केला आहे.

दुसरे प्रकरण 'आदिवासींविषयक घटनात्मक तरतुदी' स्पष्ट करणारे आहे. यात अनुसूचित जाती व जमातींच्या राष्ट्रीय आयोगाच्या कार्याची रूपरेषा दिली आहे.

'कातकऱ्यांची सद्य:स्थिती' या तिसऱ्या

प्रकरणात अभ्यासक व लेखकद्वयींनी रायगड, नासिक, पुणे, रत्नागिरी, मुबंई, दादर, नगर, हवेली या विभागातील कातकऱ्यांच्या सद्य:स्थितीच्या केलेल्या पाहणीचा विस्तृत अहवाल मांडला आहे. हे सांखिकी विश्लेषण असले तरी कातकऱ्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांची कशी पिळवणूक केली जाते व त्यांना गुलामगिरी वागणूक कशी दिली जाते याचा चित्रपटच उलगडून दाखविला आहे.

चौथे प्रकरण 'कातकऱ्यांच्या समस्या' ची जाणीव करून देणारे आहे. यात प्रामुख्याने दळी जमीन, एकसाली जमीन, खाजगी जमीन या जमिनींच्या प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे. 'दळी जमीन' म्हणजे डोंगर उतारावरील 'वरकस' जमिनी. ब्रिटीशांनी दळी जमिनींमुळे जंगलाचा नाश होतो या कल्पनेतून अशा जमिनी करण्यावर बंदी आणली. त्यामुळे कातकरी व इतर आदिवासींच्या ऊदरनिर्वाहावर गदा आली. याबाबतीत पुढे बरेच आयोग नेमण्यात आले. काही संघटनांनी लढे दिले व त्याचा परिणाम दळी जमिनींवर कातकऱ्यांची मालकी काही ठिकाणी देण्यावर कायदे झाले. परंतु त्यांची अमलबजावणी अद्यापही झालेली नाही.

असेच प्रश्न एकसाली जमिनींबाबतही निर्माण झाले. एवढेच नाही तर ज्या कातकऱ्यांच्या नावावर त्यांच्या वरकस जमिनी आहेत त्याही बिगर आदिवासींनी लुबाडलेल्या आहेत. सरकारने याबाबतीत कायदे केले आहेत, परंतु आदिवासींना अज्ञानामुळे याची माहितीच नाही. ती करून देण्याचे काम या प्रकरणातून अभ्यासकांनी केले आहे. जमीन कायद्याची विस्तृत माहिती यातून मिळते.

पाचव्या प्रकरणात 'कातकऱ्यांचे जीवन' किती हलाखीचे आहे याची माहिति यात दिलेल्या काही केस स्टडीज् मधून मिळते.

जगभरातल्या आदिवासींचे जमीनविषयक हक्क काय आहेत याची माहिती 'आदिवासी विषयक कायदे व ठराव' या सहाव्या प्रकरणात अगदी सविस्तरपणे दिली आहे. यात संयुक्त राष्ट्रसंघाने प्रसिद्ध केलेले निष्कर्ष आणि मांडलेल्या सूचना यांचा गोषवारा दिला आहे.

कातकरी समाजाच्या विकासासाठी झटणाऱ्या अनेक संस्था, संघटना आज अस्तित्वात आहेत. त्यामुळे संथ का होईना पण कातकरी समाजातील लोकही आता आपल्या समाजाच्या भवितव्याचा विचार करू लागलेत. ही 'आशेची किरणे' कोणती आहेत याची चर्चा सातव्या छोट्याशा प्रकरणात वाचायला मिळते.

आदिम जमातींतील लोकांच्या विकासासाठी शासनाचे स्वतंत्र धोरण काय असावे याची सविस्तर चर्चा आठव्या प्रकरणात करण्यात आली आहे. यात जमीन, शिक्षण, निवारा, महिला, उपजिविका, आरोग्य इत्यादी मुद्द्यांवरील धोरण स्पष्ट करण्यात आले आहे.

डॉ. विजय साठे आणि बन्सी घेवडे यांसारख्या तळमळीच्या कार्यकर्त्यांच्या कातकरी जमाती विषयीच्या २४ वर्षांच्या प्रत्यक्ष कार्यातून, अनुभवांतून व प्रगल्भ अभ्यासातून हे पुस्तक साकारले आहे. त्यामुळे निश्चितच कातकऱ्यांमध्ये काम करणाऱ्या समाजसेवकांना, अभ्यासकांना हे पुस्तक

(पृष्ठ ३८ वर पहा)

पुस्तक परिचय

डॉ. राजेंद्र डोळके

# हाकुमी व तांदळा

लेखक : सुरेश द्वादशीवार

### माडिया जमातीच्या पार्श्वभूमीवरील हाकुमी

'हाकुमी' चा नायक कन्ना हा माडिया आदिवासी तरूण आहे. पुण्याहून डॉक्टर होऊन, उच्चभ्रू संस्कार घेऊन तो आपल्या गावी - कांदोडीला परततो आणि आपल्या गावात सुधारणा करण्याचा प्रयत्न करतो. या प्रयत्नांचं चित्रण हा या कादंबरीचा गाभा होय.

अंधश्रद्धा, पारंपरिक समजुती येथे प्रभावी असतात. परंपरेविरूद्ध जाणं हे अवघडच. पोचम अवल ही देवता गावाची रक्षक. तिला नाराज केलं तर अरिष्ट ओढवलंच. लग्नाच्या बाईनं फक्त पांढरं अन् तेही एकच कापड वापरायचं, अंगात चोळी, झंपर वर्ज्य. लग्नाच्या बाईने छाती झाकली तर तिला पोरं होणार नाहीत. शेतात पीक यावं म्हणून लहान मुलाचा बळी द्यायची प्रथा. मानेवर गळू असणं हे भाग्याचं लक्षण. अशिक्षितपणा इतका की कन्ना शिकतो म्हणजे नेमकं काय करतो हेही त्याच्या वडिलांना माहीत नसतं.

गावात दवाखाना काढून लोकांना बरे करणे हेचं कन्नाचं ध्येय नाही. समाजसुधारणा, अंधश्रद्धानिर्मूलन, समाजजागृती यासाठी तो गावात शाळा काढतो, मुलाला बळी देण्याची प्रथा थांबवतो, बायांनी इच्छेनुसार अंगभर वस्त्रं घालावीत म्हणतो. गळूची ऑपरेशन्स करतो. गावच्या लोकांशी - प्रत्यक्ष आईबापांशीही - विलक्षण टक्कर देतो आणि यशस्वी होतो.

कांदोडी हे गाव निरक्षर, अंधश्रद्धाळू, मागासले असेललं, पण मनानं श्रीमंत. कन्नाने पाहिलेल्या पुण्याच्या मानाने अनेकपट अस्सल. पुण्याच्या संस्कृतीचे वर्णन काहीसे उपहासात्मक आहे. तर या आदिवासी गावाचा भावनिक शोध लेखकाने समरसून घेतला आहे. अंगभर दारिद्रय असले तरी ही माणसं धडधाकड आहेत, काटक आहेत. हसतमुख, समाधानी आहेत, निष्कपट आहेत.

कन्नाच्या या प्रवासातील महत्त्वाच्या व्यक्ती म्हणजे अनिता, रूपी व राजय्या. अनिता व रूपी ह्या त्याच्या प्रेयसी. रूपी ही माडिया तरूणी, कन्नावर जीव तोडून प्रेम करणारी. इतकी की, आईबापांनी इच्छेविरूद्ध लग्न ठरविले, तेव्हा कन्ना नाही तर कन्नाचा विवाहित भाऊ चालेल, म्हणून दुसरेपणाचा कमीपणा घेऊन कन्नाच्या घरात येते. त्याच्या येण्याची वाट पाहून एक दिवस घरातून निघून जाते. नक्षलवाद्यांच्या टोळीत सामील होते. काही वर्षांनंतर कन्नाची भेट होते. कन्ना तिला 'परत चल' म्हणतो. तिच्याशी लग्न करण्याची इच्छा प्रगट करतो. ती 'नाही' म्हणते. हा प्रसंग हृदयस्पर्शी आहे.

त्यामानाने अनिताचे चित्रण कमी ताकदीचे वाटते. पुण्याच्या वास्तव्यात ती भेटते. अनिता आदर्शाच्या, सुधारणेच्या गोष्टी बोलत असते. परंतु त्याही पाहिजे तेवढ्या हृदयातून बोलल्याचा भास

होत नाही. तरूण वयात समाजसेवेचं व्रत घेतलेली एक निष्ठावान कार्यकर्ती व कन्नाशी सहवास आल्याने मनोमन त्याच्यावर हळुवार प्रेम करणारी अशी व्यक्तिरेखा लेखकाला उभी करायची असावी. तिची अनुदारता पाहून त्याचे मूळ अनितेच्या व्यक्तित्वाविषयी लेखकाच्या अधुऱ्या कल्पनेत असावे, असे वाटते.

राजय्या हा नक्षलवादी टोळीचा प्रमुख, सुशिक्षित, घरंदाज, एम. एस्सी. मोठमोठ्या धनिकांशी आणि अधिकाऱ्यांशी वडिलांची दोस्ती. अरण्यातल्या शोषकांविरूद्धच्या नक्षलवादी संघर्षात त्याला थ्रिल वाटते. लेखकाचे या नक्षलवादी लोकांविषयी चांगले मत आहे. सावकारी मोडून आदिवासींना चोख न्याय ते मिळवून देऊ पाहतात. भ्रष्ट अधिकाऱ्यांना वठणीवर आणतात. शिवाय डोबी, चुक्की, जुरू, पवरी वगैरे आणखीही दुय्यम पात्रे या कादंबरीत आहेत. त्या पात्रांचीही स्वभावचित्रणे चांगली वठली आहेत.

संपूर्ण कादंबरीत निसर्गवर्णनं फारशी आढळत नाहीत. नाही म्हणायला जंगलातील गर्द झाडांची वगैरे काही वेळा सोबत आहे. लेखकाची शैली ठीक आहे. अलंकारांचा सोस नाही. कादंबरीत एकापाठोपाठ एक घटना वेगाने घडत जातात. कादंबरीचे पोत कसदार आहे. शृंगारिक वर्णने लेखकाने कटाक्षाने टाळली आहेत. माडियांच्या बायकांची उघडी शरीरं, रेल्यांतून तरूण पोरं-पोरी एकमेकांचा हात धरून पळून गेल्यानंतर त्यांचा प्रणय, शारीरिक मीलन व विशेषत: रूपी घरात एकटी असताना किंवा कादंबरीच्या शेवटी तिचा व कन्नाचा मुक्त प्रणय ह्या ठिकाणी शृंगारिक वर्णनांना वाव असूनही द्वादशीवारांनी तो मोह टाळला आहे.

### रहस्यमय तांदळा

आपलं उमद्या तरूणाशी लग्न व्हावं. त्याच्याकडून शरीरसुख मिळावं ह्या तारूण्यसुलभ भावना तांदळाच्या नायिकेच्याही असतात. परंतु दुर्दैवाने त्या पूर्ण होत नाहीत. तिच्या आईच्या अंगात देवी येत असल्यानं तिच्याकडेही लोक त्याच नजरेनं बघू लागतात. हळूहळू तिच्यावर देवपणाची आलेली खोळ अधिक पक्की होत जाते.

लोक देवी म्हणून तिला नमस्कार करतात, तिची मनोमन पूजा करतात, बरोबरीच्या मैत्रिणींचे आईबाप तिच्या पाया पडतात. खुद्द आई व नंतर वडीलही तशीच आदराची वागणूक देतात. तिच्याशी लगट करणाऱ्या मुलाला, प्रत्यक्ष देवीशी लगट करण्याचं पाप केलं असं समजून त्याचे वडील यमसदनास वाठवितात. पुढे रिधोऱ्याच्या महाराजाच्या एक पांगळया मुलाशी तिचे लग्न होते. परंतु तिचा नवराही तिच्याकडे देवी म्हणूनच पाहतो. ती अतृप्तच राहते.

नबाबसाहेब ऊर्फ व्यंकटेश्वरराव यांच्या पौरूषाने ती भारावते. पण हे रंगेल नबाबही तिला पाहिजे ते देऊ इच्छित नाहीत. प्रत्येक वेळी तिचा पराभव होतो. बेदरकार होऊन भोगून घेण्याची तिची इच्छा एकदाही पूर्ण होत नाही. ती खचते, नाउमेद होते, निराशेच्या खाईत लोटली जाते. देवीचा तांदळा (चेहरा) माझ्याच वाट्याला का आला असे तिला वाटत राहते.

द्वादशीवारांच्या कथेचा धागा असा आहे. बालेश्वराच्या देवळात लेखकास ही स्त्री भेटते. त्यानंतर अचानक ती नाहीशी होते. त्या स्त्रीविषयीच्या उत्कंठेपोटी वाचक ही कादंबरी उत्सुकतेने वाचतो. कादंबरीच्या कथानकाला आवश्यक असणारी वातावरणनिर्मिती लेखकाने उत्तम रीतीने केली आहे. काहीशी गूढ, रहस्यमय, भयानक अशी ही वातावरणानिर्मिती आहे. एखादा रहस्यमय हिंदी सिनेमा डोळ्यांसमोर आणा. जनकपूर हे गाव काहीसे भयाण आहे. पन्नासेक झोपड्या, एक तुटकी मशीद आणि एक चौरस्ता आहे. वस्तीच्या विरूद्ध बाजूला हिरव्या दाटीआड प्रचंड पण ओसाड 'उत्तेरचा महाल'. रस्त्यानं जाणारा माणूस सहसा या महालाकडे फिरकत नाही. या वास्तूची सगळया परिसरात एक अनाम दहशत आहे. दुसरीकडे उंच टेकडीवरचं बालेश्वराचं देऊळ. खाली गौतमी नदी. या गावाला कसला तरी शाप दिसतो. सारे स्त्रीदेहाचे भुकेले, वखवखलेले, मादीकडे पहावे तसे बघणारे. हे वातावरण वाचकालाही भारून टाकते. दिवाकर काका, त्यांची ठेवलेली बाई लक्ष्मी, लक्ष्मीची मुलगी जुई, दिवाकरकाकांचा मुलगा सवाई शंकर, यांचीही चित्रणे रहस्ययात भर घालतात.

कादंबरीच्या सुरुवातीस नायिकेची आणि लेखकाची भेट झाल्यापासून वाचकांच्या मनात नायिकेबद्दल अत्यंत उत्कंठा जागी होते. परंतु ती शमविण्याऐवजी कथानकाच्या दृष्टीने अनावश्यक पात्रे आणली जातात. दीनसाहेब, त्यांच्या पत्नी, शंकरची सासू, सी. रघुनाथराव, थोडेसे नारायण महाराज ही पात्रे पूर्णत: गाळली जरी असती तरी मूळ कथावस्तूला यत्किंचितही ढळ पोचला नसता. शेवटी हे रहस्य उकलते. पण आरंभी जी हवा निर्माण केलेली आहे, त्या मानाने हे रहस्य अगदीच सामान्य ठरते. अपेक्षाभंग करते. ●●

प्रकाशन : श्री विद्या प्रकाशन, पुणे ३०
प्रकाशन : २ मे २००३ पृष्ठे- प्रत्येकी १३९
किंमत : प्रत्येकी ५० रू.
(साभार : महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक २५६, जानेवारी-मार्च १९९१)

---

(पृष्ठ ३५ वरून पुढे)

चांगले मार्गदर्शक ठरू शकेल, यात शंका नाही. लेखकद्वयांनी 'परामर्श' प्रकरणात मांडलेली खंत अत्यंत बोलकी आहे. ते म्हणतात ५६ वर्षांच्या स्वातंत्र्यामध्ये आदिवासींमधले ५ टक्के आदिवासी समाजाच्या मुख्य प्रवाहात आले आणि वृत्तीने ब्राह्मण झाले. नोकरी व्यवसाय व राजकारणामध्ये आघाडी घेतली. आज महाराष्ट्रात ६ खासदार, २० आमदार आदिवासी आहेत, पण त्यांनी आपल्या आदिवासी बांधवांसाठी, त्यांच्या खऱ्याखुऱ्या प्रश्नांसाठी

प्रकाशक : ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स,
कशेळे, ता. कर्जत, जि.रायगड
प्रकाशन : २ मे २००३ पृष्ठे १९०
देणगी मूल्य : रू. १००/-

---

(पृष्ठ ३३ वरून पुढे)

श्री. खंडेराव सावे यांचे चरित्र लिहून मराठी साहित्यात मोलाची भर टाकली आहेच. एवढेच नाही तर समाजसेवेत येणाऱ्या आताच्या व भावी पिढ्यांनाही प्रेरणादायी ठरेल असा हा अत्यंत आटोपशीर चरित्रग्रंथ आहे. समाजसेवा क्षेत्रात कार्य करणाऱ्यांनी एकदा अवश्य हा ग्रंथ वाचावा, अशी माझी विनंती आहे. ●●

# संक्षिप्त पुस्तक परिचय

ग. शां. पंडित

## ○ आदिवासी कथा आणि व्यथा

(डॉ. धैर्यशील शिरोळे, स्नेहवर्धन प्रकाशन, ८७३ सदाशिव पेठ, पुणे - ३०. प्रथमावृत्ती - २८ एप्रिल २००२, पृष्ठसंख्या १६६, मूल्य-१५० रुपये)



डॉ. शिरोळे हे बालरोगतज्ज्ञ. वैद्यकीय सेवेत असूनही त्यांना इतिहास, पुरातन वाङ.मय व वास्तू यांत विशेष रस आहे. त्यामुळेच ते बाबा आमटे यांच्या गडचिरोली जिल्हयातील लोकबिरादरी (हेमलकसा) या आदिवासी प्रकल्पावर वैद्यकीय सेवेत रमले.

या काळात तेथील माडिया, गोंड आदिवासींमध्ये राहून त्यांना जे अनुभव आले, त्या जीवन संस्कृतीची व त्यांच्या अडी-अडचणींची त्यांना जी माहिती मिळाली तीच या पुस्तकात त्यांनी कथा रुपाने शब्दांकित केली आहे.

पुस्तकाची भाषा ओघवती व ललित्यपूर्ण असल्यामुळे ते वाचनीय झाले आहे आदिवासींमधील अत्यंत दुर्लक्षित, मागास व आदिम जमातीची या पुस्तकामुळे आपल्याला जवळून ओळख होते.

## ○ आदिवासी विश्व

(डॉ. सौ. शैलजा व डॉ. श.गो. देवगावकर, आनंद प्रकाशन धरम पेठ, नागपूर, प्रथमावृत्ती जुलै २००१, पृष्ठसंख्या २३६, मूल्य २०० रुपये)




लेखकद्वयींनी या ग्रंथात आदिवासी जमाची ओळख करुन देताना भारतातील विविध भागातील तसेच विकासाच्या विविध अवस्थांवर असलेल्या जमाती अंतर्भूत केल्या आहेत. भारतात सुमारे साडेचारशेच्या जवळपास आदिम जमाती असून त्यातील काही अजूनही अतिमागास जीवन जगतात. त्यांचा अभ्यास मानवशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व या शास्त्रांचे विद्यार्थी करीत असतात.

याशिवाय काही आधुनिक जीवन जगणाऱ्यांनाही या जमातींबद्दल, त्यांच्या संस्कृतीबद्दल कुतुहल असते. या पुस्तकात वरील सर्व जिज्ञासूंना आदिम विश्वात फेरफटका करुन आणला आहे. ज्यांना आपण मागास समजतो त्यांच्या संस्कृतीतील उदात्तपणा व सुसंस्कृतपणा यांचा परिचय यात करुन देण्यात आला आहे. त्यांचे समाज जीवन, विविध विधी, धर्मकल्पना, देव-

देवता, सण-उत्सव, लोकसाहित्य, विकासाचे प्रश्न आदी गोष्टींचा परामर्श या पुस्तकात येतो.

केवळ एवढेच नाही, तर अमेरिकेच्या नैऋत्य भागातील प्रमुख आदिवासींमध्ये जाऊन केलेल्या प्रत्यक्ष अभ्यासाच्या आधारे त्यांच्या जीवन-संस्कृतीची माहिती यात दिली आहे. तसेच भारतातील आदिवासींशी त्याची साम्यदर्शक तुलनाही केली आहे.

### ○ महाराष्ट्रातील आदिवासी जमाती

(डॉ. गोविंद गारे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे द्वितीयावृत्ती २००२, पृष्ठसंख्या २६४, मूल्य १५० रुपये)



डॉ. गारे हे भारतीय प्रशासन सेवेतील निवृत्त सनदी अधिकारी. ते बरीच वर्षे आदिवासी आयुक्त पदावर होते. त्यांनी आपल्या ४० वर्षांच्या काळात आदिवासींच्या जीवनावर व प्रश्नांवर विविध प्रकारचे विपुल लेखन केले आहे. त्यांच्या अनेक ग्रंथांना पारितोषिके सुद्धा मिळाली आहेत.

*महाराष्ट्रातील आदिवासी जमाती* हा आदिवासी जमातींची सांस्कृतिक व सामाजिक ओळख करुन देणारा मराठी भाषेतील महत्त्वाचा ग्रंथ आहे. महाराष्ट्रातील ४७ आदिवासी जमातींची ओळख या ग्रंथात लेखकाने विस्ताराने करुन दिली आहे. सोबत त्यांना आदिवासी प्रदेश, विकासाच्या योजना, बदलते आदिवासी जीवन याविषयीची माहिती सुद्धा विस्ताराने मांडली आहे. हा ग्रंथ विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्यांना निश्चितच उपयुक्त ठरणारा आहे.

### ○ सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतील ठाकूर (ठाकर) आदिवासी




(डॉ. गोविंद गारे, श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ, प्रथमवृत्ती-मार्च २००२, पृष्ठ संख्या - ३०८, मूल्य २५० रुपये)

डॉ. गारेंनी ठाकूर (ठाकर) आदिवासी जमातीवर लिहिलेला हा मराठीतील एकमेव ग्रंथ आहे. ही जमात फक्त महाराष्ट्र राज्यात आढळते, तीही प्रामुख्याने पुणे, ठाणे, अहमदनगर, नाशिक, रायगड जिल्ह्यांच्या डोंगराळ व पठारी पट्ट्यात व अजिंठा पर्वताच्या रांगात आढळते. सामाजिकदृष्टया ही जमात क आणि म अशा गटांत विभागलेली आहे. ही जमात काही भागात *ठाकर* तर काही भागात *ठाकूर* या नावाने ओळखतात. या ग्रंथामुळे या समाजाची एक सामाजिक-सांस्कृतिक जाणिवेची उणीव भरुन निघाली आहे. विसाव्या शतकातील ठाकूर (ठाकर) आदिवासींची सामाजिक स्थिती जाणून घेण्यासाठी व २० व्या शतकाच्या उत्तरार्धात या जमातीत झालेल्या बदलाचा वेध घेण्यासाठी हा ग्रंथ एक महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ ठरणार आहे.

## ○ बदलाच्या उंबरठ्यावरील कोकणा आदिवासी

(डॉ. गोविंद गारे, श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ, प्रथमवृत्ती- जून २०००, पृष्ठ संख्या - ३५४, मूल्य १५० रुपये)



कोकणा आदिवासींवर मराठीत वा इंग्रजीत एकही ग्रंथ नव्हता, त्यामुळे डॉ. गारे यांच्या या पुस्तकाने ती उणीव भरुन काढली आहे.

कोकणा समाजाच्या परंपरा, संस्कृती, सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा आढावा या ग्रंथात विस्ताराने घेतलेला आहे. नासिक जिल्ह्याच्या उत्तरेकडील पेठ, सुरगाणा, कळवण, बागलाण, साक्री, धुळे व डांग जिल्ह्यांमध्ये ही जमात पसरलेली आहे. धुळे, नंदूरबार जिल्हयांत ही जमात कोकणी नावाने ओळखली जाते, तर नासिक जिल्ह्यात कोकणा या नावाने. या समाजाची सामाजिक व सांस्कृतिक स्थिती जाणून घेण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा दुवा आहे.

## ○ भारतातील आदिवासी वंश

(प्रा. वि. श्री. कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २००२, पृष्ठसंख्या २०७, मूल्य १२५ रुपये)



प्रा. कुलकर्णी हे मानवशास्त्राचे अध्यापक व अभ्यासक आहेत. त्यांनी या ग्रंथाच्या निमित्ताने भारतातील आदिम जमातींच्या वांशिक स्थितीचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे.

ग्रंथाची विभागणी दोन भागांत केली आहे. पहिल्या भागात दोन प्रकरणे असून पहिल्या प्रकरणात प्रा. युजेन फिशरच्या मूळ जर्मन भाषेतील उताऱ्याचे लेखकाने केलेले इंग्रजी भाषांतर आहे, तर दुसरे प्रकरण सर आर्थर कीथचे आहे. ही दोन्ही प्रकरणे पुस्तकाच्या दुसऱ्या भागाचे फक्त आकलन होण्यासाठी प्रास्ताविक म्हणून उपयोजिलेली नसून भारतातील मानवी वंशाच्या सहसंबंधांचा, विशेषत: गुंतागुंतीचा भाग समजण्यासही उपयुक्त आहेत. दुसऱ्या भागात पाच प्रकरणे व एक परिशिष्ट आहे. हा भाग थोडा रंजक झाला आहे.

पुस्तक परिचय

विदुला पुरोहित

# मुक्ता

लेखक : प्रा. देवदत्त हुसळे

प्रा. देवदत्त हुसळे यांनी शब्दबद्ध केलेले हे पुस्तक मनाला चटका लावतेच, पण त्यापेक्षा जास्त मनाला उभारी देते. डॉ. रजनीकांत आरोळे व डॉ. मेबल आरोळे ह्या दोघांनी ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड अंतर्गत जे अतुलनीय काम केले आहे, त्या कामाचा चालता बोलता दाखला म्हणजे हे पुस्तक आहे. एक दुर्लक्षित, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक या सर्व बाबतीत मागास असलल्या महिला जर संधी मिळाली तर काय करुन दाखवू शकतात याचे चित्रण ह्या पुस्तकात आहे.

डॉ. आरोळे यांच्या प्रेमळ दिशादर्शक व अथक प्रयत्नांनी अनेक महिला ह्या आत्मनिर्भर झाल्या आहेतच; पण त्यांनी स्वत:बरोबर अनेकांना आत्मनिर्भर केले आहे. तळागाळापर्यंत विकास झाला तरच भारताचा खरा विकास होऊ शकतो हे वाक्य आपल्यासारख्या सुशिक्षितांच्या दृष्टीने चावून चोथा झालेले आहे पण हेच वाक्य कधीच न ऐकलेल्या, विकास हा शब्दच माहिती नसलेल्या या महिलांनी मिळालेल्या संधीचा उपयोग करुन स्वत:ची कौशल्ये वाढवलीच, पण गावातील अनेकांना मार्गदर्शन केले.

अज्ञान, अंधश्रद्धा भीती यामुळे समाजाचे किती नुकसान होते आणि ते नुकसान आपण योग्य वेळी काळजी घेतली, उपाययोजना केली तर थांबवू शकतो. या महिलांनी आरोग्य शिक्षण घेऊन त्याचा उपयोग व वापर आपल्या समाजासाठी केला. आलेल्या अडचणी, विरोध यांना न जुमानता आपले काम चालूच ठेवले. त्यांच्या कामावरील श्रद्धेमुळेच सुरुवातीला विरोध करणारे गाव नंतर त्यांच्या बरोबरीने येऊ लागले. आरोग्य शिक्षणाबरोबर शिवणक्लास, शेळीपालन, मासेमारी, किराणा दुकान अशा कौशल्यांनी त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनवले.

सोफिया, इंदू, लालन, सुमन, साळू, गंगूबाई, पारु, सत्यभामा, शोभा पवार, यमुना, लिलाबाई, सुरेखा, बबई, सखूबाई या सर्वांच्याच हकिग ती जिवला चटका लावणाऱ्या आहेत. मागास आदिवासी, अस्पृश्य व दरिद्री अशा या महिलांना रोजचे जीवन जगण्यासाठी केवढा संघर्ष करावा लागतो. या पावलोपावलीच्या संघर्षातून, अन्यायातून, कष्टातून या महिला कुठेही कडवट झालेल्या आढळत नाहीत, उलट आपल्यासारख्या महिलांचे आयुष्य जास्तीत जास्त सुकर करावे म्हणून धडपडत आहेत.

दारिद्र्याने पिचलेला संसार स्वाभिमानाने रेटणारी सरु, पोटाच्या आगीसाठी एकदाच शेरभर वरई चोरते; पण ते पण तिला जमत नाही. अशी सरु जामखेड आरोग्य प्रकल्पात काम करु लागल्यावर आधी मिरच्यांचा व आता बांगड्यांचा धंदा करु लागली. या मागास सरुच्या प्रयत्नाने अनेक सवर्ण महिला बऱ्या झाल्या आणि होत आहेत.

परिगाची कथा तर जगावेगळीच आहे. आई

गेल्याने त्यातच लहान वयात महारोग झालेली परिगा ही तशीच सडून मरायची; पण डॉ. आरोळे व डॉ. मेबल आरोळे यांच्या उपचाराने, प्रेमळ सेवेने पूर्ण बरी तर झालीच, पण आरोग्य सेविका म्हणून काम करु लागली. तिची सावली पडलेली जिथे चालत नव्हती तिथे ती आज सर्वात ज़ास्त चालणारे किराणा दुकान चालवत आहे.

दोन लग्न होऊन सुद्धा धड संसार न झालेली लालन आपल्या आईबापाचा संसार सांभाळत होती. मजुरीच्या कामावर जाताना मुकादमाशी तिचे अनैतिक संबंध आहेत म्हणून जातीने त्यांच्यावर बहिष्कार घातला होता. अशा बहिष्कृत लालनला गावच्या सरपंचांनी जामखेडचा मार्ग दाखवला. आता ही अशिक्षित लालनबाई पुणे, औरंगाबाद, नाशिक ह्या ठिकाणी डॉक्टरांसमोर बोलून आली आहेच, पण निर्मला निकेतन, समाज कार्य विद्यालयाच्या मुलांना कम्युनिटी डेव्हलपमेंट म्हणजे काय हे सांगितल्यावर त्यांच्याकडून द बेस्ट टिचर हे बिरूद मिळवले आहे.

शोभा पवार ही पारधी महिला म्हणते की, 'पारधी म्हटले की सगळ्यांच्याच कपाळावर आठी चढते अशा समाजातील मला एवढे मोठे शिक्षण मिळाले. मला माणूस म्हणून जगायला मिळाले यापेक्षा मोठा पुरस्कार काय असेल? मी माती होते; माझं जीवन सुगंधीत झालं. कचरा झालेल्या जीवनाला मोत्यांचे मोल आलं. मेबल बाईसाहेब व डॉक्टर आरोळेंमुळेच माझा मुलगा सध्या शिकत आहे अन्यथा कुठल्यातरी जबरी चोरीत किंवा दरोड्यात सापडून एव्हाना तुरुंगात सुद्धा जाऊन आला असता.'

सोफिया ही मुसलमान महिला सांगते की, संशयी पतीमुळे जगणे मुश्किल झाले होते; पण रत्नाबाई कांबळे यांच्या प्रयत्नाने सोफियाचा संस्थेत प्रवेश झाला. आज ती पाटोदयाच्या ग्रामपंचायतीची उपसरपंच आहे. सोफिया म्हणते डॉ. मेबल बाईसाहेब व डॉ. आरोळे साहेब नसते तर आत्तापर्यंत सोफियाच्या कबरीवर गुढगाभर गवत आले असते.

यासारख्या अनेक सत्यकथा या पुस्तकात आहेत. ग्रामीण आरोग्य प्रकल्प कार्यक्रमाने या महिलांना आरोग्य शिक्षण व प्रशिक्षण तर दिलेच, पण त्याचबरोबर या महिलांना उत्पन्न निर्मितीची अनेक कौशल्ये दिली, ज्यामुळे ह्या महिला आपल्या भागात सतत कार्यरत आहेत व इतरांना या प्रवाहात सामील करुन घेत आहेत. शिक्षण, पैसा, जात इ. सर्व गोष्टींची कमतरता असताना सुद्धा या महिला डॉ. मेबल व डॉ. रजनीकांत आरोळे यांचे रोगमुक्त व निरोगी समाज घडविण्याचे व्रत अंगीकारुन ते पूर्ण करण्यासाठी धडपडत आहेत. हे पुस्तक वाचून व त्यांचे अनुभव वाचून आपण सर्वजण हा वसा पुढे नेण्यासाठी उद्युक्त होऊ अशी आशा वाटते.

प्रा. हुसळे यांनी हे अनुभव अत्यंत प्रवाही भाषेत शब्दबद्ध केले आहेत. केवळ त्यांच्यामुळेच ह्या महिला छायाचित्रासह आपल्यापर्यंत पोहोचू शकल्या आहेत. सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना अत्यंत प्रेरणादायी ठरेल असे हे पुस्तक आहे. प्रत्येक स्त्री-पुरूष कार्यकर्त्याने आवर्जून वाचावे. ●●

प्रकाशक : संचालक, ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड, जि. अहमदनगर ४१३२०१. प्रथमावृत्ती - २००३

पुस्तक परिचय

ग. शां. पंडित

# ' यशोगामिनी'

संपादिका : सौ. मेधा रानडे

के. ई. एम. रुग्णालय संशोधन केंद्राच्या पाबळ येथील महिला आरोग्य व विकास प्रकल्पांतर्गत 'यशोगामिनी व 'माहिती पुस्तिका' या दोन पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या. हा प्रकल्प शिरुर तालुक्यातील काही गावांमध्ये राबविण्यात आला.

'यशोगामिनी' या पुस्तिकेत प्रकल्पाच्या उपक्रमांमुळे ज्यांच्या आयुष्यात काहीतरी बदल झाला अशा महिलांची प्रतिनिधीक स्वरुपाची माहिती आहे.

या प्रकल्पांतर्गत आरोग्य शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, महिला मंडळ, स्वावलंबन, अल्पबचत गट इत्यादी उपक्रमांचा अंतर्भाव होता. त्याच अनुषंगाने या पुस्तिकेचे चार भाग करण्यात आले आहेत.

पहिल्या भागात 'स्वावलंबन गटाच्या लाभार्थींची' मनोगते दिली आहेत. हा उपक्रम महिला मंडळाचा असून महिलांना बचतीतून सवय लागावी यासाठी सुरु करण्यात आला. बचतीतून सहजपणे कर्ज मिळू शकते व त्यातून लहानसा व्यवसाय करता येऊ शकतो हीच या स्त्रियांच्या दृष्टीने महत्त्वाची बाब होती. शिरुर तालुक्यात शेळी पालन व्यवसाय मोठ्या प्रमाणात आहे. त्याचा या स्त्रियांना कसा फायदा झाला व त्यांच्या जीवनात काय बदल घडून आला, याची माहिती १० प्रतिनिधीक मनोगतांमधून मिळते.

दुसऱ्या भागात 'शासकीय, निमशासकीय' योजनांच्या लाभार्थींचे अनुभव दिले आहेत. यात विशेष करुन रोपवाटिका, शिलाई मशींनसाठी अनुदान, महिला समृद्धी योजना, निर्धूर चूल, गरीब मुलींना शालेय साहित्य, मोतीबिंदू शस्त्रक्रिया इत्यादी संदर्भात देण्यात आलेल्या अर्थसहाय्यामुळे महिलांच्या जीवनात झालेल्या बदलांची नोंद आहे. यातील चारही अनुभव बोलके आहेत.

तिसरा 'व्यवसाय प्रशिक्षण लाभार्थींचा' भाग प्रकल्पामार्फत विविध व्यवसाय प्रशिक्षणाची सोय करण्यात आलेली होती. त्याचा अनेक मुली व महिलांना कसा फायदा झाला व शेतीशिवाय रोजगाराच्या इतर साधनांची माहिती त्यांना कशी मिळाली याविषयीची ३ मनोगते आहेत.

'महिला मंडळा' विषयीच्या या भागात 'डवाक्रा' योजनेत सहभागी झालेल्या व वेगवेगळे व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या यशस्वी जीवनात ओळख होते. हे सगळे अनुभव व मनोगते आताच्या बचतगटांच्या महिलांना अत्यंत प्रेरणादायी ठरणारे आहेत कारण या सर्व महिला गरीब आर्थिक परिस्थितीतल्या ग्रामीण महिला आहेत.

सौ. मेधा रानडेंनी ही पुस्तिका अगदी नेटकेपणाने संपादित केली आहे. त्यांनी प्रस्तावनेत प्रकल्पाबाबत व पुस्तिकेच्या मांडणीबाबत सविस्तर व मुद्देसूद माहिती दिली आहे. त्यातूनच एकंदर पुस्तिकेची कल्पना येते. महिला बचत गटाच्या सदस्यांनी जरुर वाचावी अशी आहे. ●●

# लेखकांसाठी

हाकारा त्रैमासीकाचे ह रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. गेली २५ वर्षे अखंडपणे आदिवासी जीवन, संस्कृती, समस्या, कला, साहित्य आदी गोष्टींची ओळख इतर पांढरपेशी-नागर समाजाला करून दिलेली आहेच, परंतु त्याचबरोबर आदिवासी नवसाहित्यिकांना एक हक्काचे व्यासपीठ हाकारा च्या रूपाने मिळाले आहे.

अशा या नियतकालिकात आणखीही काही कार्यकर्त्यांना आपले विचार मांडायचे असतील, लेखक-कवींना आपले साहित्य प्रसिध्द व्हावे असे वाटत असेल, तर जरूर लिहावे व आमच्याकडे पाठवावे. पत्ता अंकात दिलेला आहेच.

# निवेदन

( फॉर्म ४, नियम ८ नुसार )

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : | ६४, आनंद पार्क, पुणे ४११ ००७ |
| २. प्रकाशन काळ | : | त्रैमासिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक, संपादक | : | रामचंद्र केशव मुटाटकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | ६४, आनंद पार्क. औंध, पुणे ४११ ०१७ |
| ४. स्वामीत्व | : | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद |

मी, रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीनुसार खरा आहे.

रा. के. मुटाटकर
प्रकाशक

३१ जानेवारी २००४

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## ( द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस - मास )

मानव विज्ञान या संज्ञेमध्ये मानव, समाज, संस्कृती व पर्यावरणाशी असलेले नाते याविषयी सर्वांगीण दृष्टीने अभ्यास करणाऱ्या सर्व विद्याशाखांचा अंतर्भाव होतो. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची स्थापना १९७६ साली पुणे विद्यापीठात झाली. शासन, सामाजिक कार्यकर्ते व संशोधक यांना एका व्यासपीठावर आणून आदिवासी, ग्रामीण तसेच शहरी समाजातील लोकांच्या समस्या समजावून त्या सोडविण्यासाठी ज्ञान व अनुभवाचा उपयोग करणे हे परिषदेचे मुख्य ध्येय आहे. महाराष्ट्र राज्याचे पहिले आदिवासी सचिव - आयुक्त श्री. वसंत मंडलेकर हे संस्थेचे पहिले अध्यक्ष होत. त्यानंतर प्रा. गं. बा. सरदार, श्री जनार्दन वळवी, प्रा. पां. वा. सुखात्मे, प्रा. अ. रा. कुलकर्णी यांनी अध्यक्षपद भूषविले. आदिवासी भागात काम करणारे कार्यकर्ते तसेच आदिवासी साहित्यिक यांना महाराष्ट्रात प्रथमच परिषदेने एका व्यासपिठावर आणले.

केवळ आदिवासींच्या प्रश्नांना वाहिलेले हाकारा त्रैमासिक गेली २५ वर्षे परिषदेतर्फे प्रकाशित होत आहे. लोकांच्या समस्या त्यांच्या नजरेतून समजून, त्यांचा सहभागातून एकात्मिक विकास साधण्याची परिषदेची वैचारिक बैठक आहे. आर्थिक विकास व समता हे परिषदेचे ब्रीद आहे. आदिवासी उत्थान कार्यक्रमाव्दारे आदिवासी समाजाच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आदिवासी लोकांचे सबलीकरण करणे व त्या प्रक्रियेतून त्यांचा आत्मविश्वास, आत्मसन्मान व अस्मिता जागृत करणे हा परिषदेचा दृष्टिकोन आहे. त्याव्दारे बहुविध राष्ट्रीय सांस्कृतिक प्रवाहास आदिवासी संस्कृतिच्या योगदानाच्या निरंतर संधी प्राप्त होतील.

यापुढील काळामध्ये आर्थिक परिवर्तनाव्दारे सामाजिक क्षेत्रांचा विकास घडवून आणणाऱ्या सरकारी व स्वयंसेवी संस्थाच्या सहकार्याने वाटचाल करण्याचा परिषदेचा मानस आहे. परिषदेची कार्यकक्षा अधिक विस्तृत व्हावी या हेतूने दोन केंद्रांची स्थापना केली आहे.

१. स्वास्थ्य व विकास संशोधन केंद्र 　　 २. आदिवासी व ग्रामीण विकास केंद्र

### महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

हाकारा वार्षिक सभासद १०० रुपये ( व्यक्तींसाठी ) हाकारा वार्षिक सभासद १५० रुपये ( संस्थासाठी )
परिषद आजीव सभासद १००० रुपये (व्यक्तींसाठी )

परिषदेच्या आजीव सभासदांना हाकारा विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक / आजीव वर्गणी कृपया खालील पत्त्यावर महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ( द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस ) यांचे नावे डिमांड डाफ्ट अथवा मनिऑर्डर पाठवावी. मनिऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

### पत्रव्यवहाराचा पत्ता

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद , ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७

आपल्या क्रियाशील सहकार्याबद्दल धन्यवाद